दैनिक
# सिंधुदुर्ग समाचार
ग्रामीण जनतेचे एकमेव लोकप्रिय मराठी दैनिक
सिंधुदुर्ग-मुंबई
www. sindhudurgsamachar. in
T-2/RNP/SDG-06/2019-2021
संस्थापक : प्राचार्य मुकुंदराव कदम

## रविवार पुरवणी १४ जुलै २०२४



जगन घाणेकर,
घाटकोपर, मुंबई

## हाथरस दुर्घटना : प्रशासनाला जाब कोण विचारणार ?

हाथरस येथील दुर्घटनेनंतर संपूर्ण देशभरात मतमतांतराचा प्रवाह वेगाने वाहू लागला. स्वतःला पुरोगामी म्हणून घेणाऱ्या, नास्तिकतावादी विचारसरणीच्या विचारवंतांनी वर्तमानपत्रांतून पानभर लेख लिहून यामागे हिंदूंच्या अंधश्रद्धाच कशा कारणीभूत आहेत, भोळ्याभाबड्या हिंदूंना आधुनिक महाराज, बाबा कसे फसवत आहेत याची वेगवेगळी उदाहरणे देऊन वाचकांना ते पटवून देण्याचा प्रयत्न केला, कुणी या बाबा महाराजांची पाळेमुळे खणून काढण्याची मागणी केली, कुणी यांना सार्वजनिक कार्यक्रम करण्याची अनुमतीच देऊ नये अशी मागणी केली तर कुणी असले प्रकार थांबावे यासाठी राष्ट्रीय स्तरावर अंधश्रद्धा निर्मूलन कायदा करण्याची आवश्यकता असल्याचे ठासून सांगितले. लोकांच्या श्रद्धेचा गैरफायदा घेऊन त्यांना लुबाडणारे समाजात कैक आहेत; मात्र यासाठी सर्वच महाराजांच्या सार्वजनिक कार्यक्रमांवर बंदी आणण्याची मागणी कितपत योग्य आहे ? गर्दी, चेंगराचेंगरी या गोष्टी केवळ धार्मिक कार्यक्रमांतच होतात का ?

भारताने टी-२० विश्वचषक जिंकल्याच्या निमित्ताने हल्लीच मुंबईतील मरिन ड्रइव्ह येथे काढण्यात आलेल्या परेडसाठी जमलेल्या लाखोंच्या जनसमुदायामध्ये अनेकांना श्वास कोंडल्याचा, गुदमरण्याचा त्रास झाला होता. मुळात ज्या ठिकाणी गर्दी होते अशा ठिकाणी गर्दीचे व्यवस्थापन करण्यासाठी पुरेशी सक्षम यंत्रणा कार्यान्वित असणे अत्यंत आवश्यक असते. आपल्याकडे या यंत्रणेचा अभाव वेळोवेळी दिसून येतो. ज्या कार्यक्रमांना गर्दी होणार असते असे कार्यक्रम प्रशासनाच्या परवानगीनेच पार पडतात त्यामुळे किती प्रमाणात गर्दी होणार याचा अभ्यास करून तशी यंत्रणा अगोदरच तैनात करणे हे प्रशासनाचे दायित्व नव्हे का ? देवस्थानांच्या यात्रांच्या ठिकाणीही गर्दी होते अशा ठिकाणीही चेंगराचेंगरी झाल्याचे प्रकार यापूर्वी



घडले आहेत. देवळापर्यंत जाणारा रस्ता अरुंद असणे, मार्गाचा बराच भाग स्टॉलधारकांनी व्यापलेला असणे यांमुळे भाविकांना येण्याजाण्यासाठी पुरेशी जागा उपलब्ध न झाल्याने असले प्रकार घडत असल्याचे ज्ञात असूनही रस्त्याची रुंदी वाढवणे, मंदिरात जाण्याच्या मार्गात स्टॉधारकांना परवानगी न देणे यासारख्या उपाययोजना प्रशासनाकडून केल्या जात नाहीत. मांढरदेवीच्या यात्रेसाठी पूर्वी लाखो भाविक येत असत. या ठिकाणी दुर्घटना घडल्यानंतर ती कशामुळे घडली याविषयीचा अभ्यास करून त्यावर उपाययोजना काढण्याऐवजी प्रशासनाने या ठिकाणी यात्रेची प्रथाच बंद केली.

एका आकडेवारीनुसार गेल्या ४० वर्षांत जगभरात चेंगराचेंगरीच्या घटना घडून ७ हजाराहून अधिक व्यक्ती मरण पावल्या, तर १४ हजाराहून अधिक जखमी झाले. अशा एकूण २१३ घटनांपैकी ४९ घटना स्टेडियममध्ये, २५ घटना ऑर्केस्ट्राच्या कार्यक्रमांत, ३८ राजकीय मेळाव्यांत, तर ४१ घटना धार्मिक कार्यक्रमांत घडल्या आहेत. उरलेल्या ६० घटना कसलेही सकृत कारण नसतांना घडलेल्या आहेत. स्टेडियममध्ये दुर्घटना घडली म्हणून कुणी स्टेडियम कायमचेच बंद केले नाहीत. ऑर्केस्ट्राचे कार्यक्रम किंवा राजकीय मेळावे आदींवर आजतागायत बंदी आणण्यात आलेली नाही, गेल्या ३० वर्षांत एकट्या हज येथे ३ हजाराहून अधिक व्यक्ती भीषण गर्दीत मीना व्हॅलीमध्ये मरण पावल्या आहेत; मात्र तेथील सरकार आणि प्रशासन यांनी हज यात्रेवर बंदी आणली नाही किंवा त्यावर निर्बंधही लादले नाहीत. जगभरात सर्वाधिक व्यक्तींचा मृत्यू हा जत्रा, धार्मिक यात्रा, मेळे अशा ठिकाणी झालेल्या चेंगराचेंगरींमध्ये झाला, हे सत्य असले तरी त्यावर बंदी आणणे योग्य नाही. अशा घटना रोखण्यासाठी अन्य देशांत उपाययोजना काढल्या जातात; मात्र आपल्या देशात प्रशासन आपले दायित्व झटकून त्यावर थेट बंदी आणते. हाथरस येथील दुर्घटनेनंतर प्रसार. माध्यमांसह पुरोगामी मंडळींनी सर्व दोष भोलेबाबा यांच्यावर टाकून त्यावर चर्चा घडवून आणल्या, भोलेबाबा कोण आहेत, ते एव्हढे मोठे झाले कसे इथपासून तर त्यांची संपत्ती किती, त्यांच्याकडे एव्हढी संपत्ती आली कुठून याचा लेखा जोखा मांडला. हिंदू कसे बुवाबाबांच्या मागे लागून स्वतःचे नुकसान करवून घेत आहेत, एकविसाव्या शतकात विज्ञानाने एव्हढी प्रगती केली असताना बहुतांश हिंदू अद्यापही अंधश्रद्धेच्या गर्तेत असल्याचे चित्र निर्माण करण्यात आले, त्याला आधार देण्यासाठी हिंदूंच्या प्रथा परंपरांमध्ये कशा अंधश्रद्धा भरल्या आहेत यावरही चर्वण करण्यात आले; मात्र या घटनेमागील मूळ कारण शोधण्याचा आणि अशा घटना यापुढे ना घडण्यासाठी भविष्यात कोणत्या उपाययोजना करणार याचा जाब प्रशासनाला कोणीच विचारला नाही.

समाजाची नीतिमत्ता आज कामालीची ढासळली आहे. खून, बलात्कार, विनयभंग, एकतर्फी प्रेमातून हत्या यासारख्या घटना प्रतिदिन वाचनात येत आहेत. नात्यांमधील विश्वासही लोप पावू लागला आहे. दिल्लीपासून गल्लीपर्यंत भ्रष्टाचाराची पाळेमुळे विखुरली आहेत ज्याचा सर्वसामान्यांना प्रतिदिन सामना करावा लागत आहे. महागड्या इलेक्ट्रॉनिक वस्तूंपासून घरात येणाऱ्या भाजीपर्यंत सर्वच बाबींत भेसळ केली जात आहे. स्वार्थ, अनैतिकता, दुराचार जागोजागी दिसून येत आहे. व्यावहारिक जीवनात यशस्वी कसे व्हायचे याचे धडे शालेय अभ्यासक्रमातून दिले जात असले तरी नीतिमान आयुष्य कसे जगायचे याबाबत शाळेत शिकवले जात नाही. आपल्या प्रत्येक कृतीकडे आणि मनात येणाऱ्या विचारांकडे जगनियंत्या भगवंताचे लक्ष आहे. जीवनाच्या अंती आपल्याला त्याच्याच चरणी जायचे आहे. आपल्या प्रत्येक पाप पुण्याचा हिशोब त्याच्याकडे मांडलेला आहे ही जाणीव कोणतेही दुष्कर्म करण्यापासून परावृत्त करते. ही जाणीव मनात निर्माण झाली की प्रत्येक कृती करताना माणूस या कृतीमुळे अन्य कुणाची हानी होणार नाही ना ? याचा शतदा विचार करतो, तिनिमत्तेने आणि सदाचाराने वागतो. ही जाणीव जनमानसांत निर्माण करण्याचे काम आजचे प्रवचनकार, निरुपणकार, कथाकार मंडळी करत आहेत. धर्मग्रंथांतील प्रसंगांचा, शिकवणुकीचा सार ही मंडळी लोकांना सांगून त्यांच्यात साधनेचे बीज रोवण्याचे कार्य करत असतात जी आजच्या काळाची नितांत गरज आहे. त्यामुळे हाथरस दुर्घटनेनंतर प्रशासन स्वतःची गर्दी नियंत्रण व्यवस्था चोख करण्याऐवजी प्रवचनकार, कथाकार, संत मंडळींच्या सत्संगाच्या कार्यक्रमांवर निर्बंध आणणार असेल तर ते समाजाची हानी करणारे असेल.

### नवीन सदर

**समाजात वावरताना आवश्यक कायदे व त्यासंबंधीची प्राथमिक माहिती प्रत्येक सर्वसामान्य नागरिकास असायला हवी या उद्देशाने ठाणे, मुंबई येथील विख्यात विधितज्ज्ञ, प्रथितयश लेखक, वकील व नोटरी असलेले श्रीनिवास भार्गवराम घैसास हे दै. सिंधुदुर्ग समाचारच्या वाचकांसाठी 'कायद्याचे बोलूया!' ही साप्ताहिक लेखमाला घेऊन येत आहेत.**

**सिंधुदुर्ग समाचारचे सर्व वाचक व संपूर्ण समाजालाच या सदराचा फार मोठा उपयोग होईल अशी खात्री आहे.**

# स्वयंभु महालक्ष्मीचे गाव- केळशी

स्वयंभु श्री महालक्ष्मीदेवीचे मंदिर ही केळशीची पहिली ओळख आहे. श्री देव काळभैरव हे केळशी गावचे ग्रामदैवत असले तरी श्री देवी महालक्ष्मी व श्री देव काळभैरव ही दोन्ही दैवते येथील सर्वांची श्रद्धास्थाने आहेत. अनेकांच्या मते येथील श्री देवी महालक्ष्मीचे मंदिर हे पेशवेकालीन असल्याचे सांगतात. मात्र येथील पिढीजात पुजारी असलेल्या घैसास कुटुंबातील असलेले श्रीनिवास घैसास सांगतात, हे मंदिर पेशवेकाळाच्याची खूप आधीपासुनचे असावे. कारण श्री देवी महालक्ष्मीच्या गाभाऱ्यातील एका समईवर 'शके ८८४' कोरलेले आहे. म्हणजेच केळशी येथील श्री देवी महालक्ष्मीचे मंदिर एक हजारहून अधिक वर्षांपासूनचे आहे. श्री देवी महालक्ष्मीची मूर्ती किंवा पाषाण हे स्वयंभु आहे. तसेच हे अतिशय जागृत असे देवस्थान आहे. या श्री देवी महालक्ष्मीच्या काही आख्यायिका प्रचलित असल्या तरी कोल्हापूरची श्री देवी महालक्ष्मी (अंबाबाई) आणि या महालक्ष्मीचे एक अतुट नाते आहे. ज्या कोणास कोल्हापुरात जाऊन श्री देवी महालक्ष्मीचे दर्शन घेणे शक्य होत नाही, ते भाविक केळशी येथील श्री देवी महालक्ष्मीचे दर्शन घेतात. असे केल्याने थेट कोल्हापूर येथील श्री देवी महालक्ष्मीचे दर्शन घेतल्याचा अनुभव येतो किंवा तसे फळ मिळते अशी श्रद्धा व भावना आहे. खुद्द घैसास कुटुंबियांसही केळशी येथील श्री देवी महालक्ष्मीच्या कृपाछायेचा अनेक वेळेस प्रत्यय व अनुभव आलेला आहे.

श्री देवी महालक्ष्मी मंदिरापासून अगदी काही अंतरावरच याकुब बाबा यांचा प्रसिद्ध दर्गाह आहे. याकुब बाबा हे छत्रपती शिवाजीमहाराजांचे अकरावे गुरु मानले जातात. खुद्द छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, श्रीमंत पेशवे आदींनी अनेकदा या दर्ग्यास भेट दिली असल्याचे अनेक बखरींमध्ये उल्लेख आढळतात. केळशी गावात साधारण एक तृतीयांश मुस्लीम धर्मीय वस्ती आहे. मात्र श्री देवी महालक्ष्मी आणि याकुब बाबा दर्गाह यांमुळे या गावात किती उत्तम सामाजिक एकोपा आहे हे सातत्याने व पुरातन काळापासून प्रत्ययास आले आहे.

केळशी येथील फडके कुटुंबिय हे केळशी येथील श्री देवी महालक्ष्मीचे प्रमुख व प्रथम मानकरी असले तरी येथील घैसास,महाजन, वर्तक, आखवे,जोशी, पंचमाने, विद्ध्वांस, खांबेटे या मानकऱ्यांचाही मान मोठा आहे. यांपैकी महाजन व वर्तक हे मानकरी देवस्थानाचा कारभार पाहतात, तर पंचमाने देवस्थानासंदर्भातील वादविवाद व न्यायनिवाडे करतात. याशिवाय श्री.देवी महालक्ष्मीच्या प्रत्येक उत्सवात गावातील सर्व समाजबांधवांना समसमान व योग्य न्याय देण्यात आलेला असून देवस्थानाच्या पारंपारिक कामांचीही वाटणी केलेली आहे.पुर्वीच्या काळात अनेकदा मुघल राजवटींनी केळशी गावावर आक्रमण केले आहे. आजच्या काळात हे गाव दापोली शहरापासून काहीसे लांबचे दिसत असले तरी या गावास नितांत -सुंदर समुद्रकिनारा व बंदर लाभल्याने हे गाव पुर्वीपासून बाजारपेठेचे गाव आहे. येथील बाजारपेठा या छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात अधिक भरभराटीस आल्या होत्या. येथील सधन शेतकरी, व्यापारी, पेठा यामुळेच केळशीवर अनेकदा परकीय आक्रमणे झाल्याचे उल्लेख आढळतात. मुघल राजवटीच्या आक्रमणात गावाचे श्रद्धास्थान असलेल्या श्री देवी महालक्ष्मीच्या पुरातन मंदिरास कोणतीही हानी पोहोचु नये यासाठी या मंदिराची रचना अंडाकार किंवा घुमटाकार आहे. त्यामुळेच दुरुन किंवा बाहेरून बघताना अनेकांस येथे मशिदच असावी असे वाटते.

केळशी गावात सर्व धर्मियांचे सारे सण समारंभ साजरे होत असले तरी गावात सार्वजनिक स्वरुपात साजरा होणारा शिमगोत्सव व श्री देवी महालक्ष्मीची रथयात्रा, मुखवास आणि याकुबबाबा यांचा उरुस हे येथील प्रमुख उत्सव आहेत. श्री देवी महालक्ष्मीचा मुखवास हा एक धार्मिक सोहळाच आहे. देवीचे स्वयंभु पाषाण असले तरी उत्सवानिमित्त देवीला मुर्तीरुपात सजविले जाते. देवीची मूर्ती सुमारे तीन किलोग्रॅम वजनाच्या



सजविले जाते. देवीची मूर्ती सुमारे तीन किलोग्रॅम वजनाच्या सोन्याची असून तेवढ्याच वजनाचे देवीचे अलंकार आहेत. उत्सवासाठी सोन्यारुप्याने सजविलेली श्री. देवी महालक्ष्मी

## मनाच्या हिंदोळ्यावर



बाबू घाडीगांवकर,
त्रिंबक, ता.मालवण.
मो. ९४२२९७६९९५.



फारच मनोहारी व विलोभनीय दिसते.

चैत्र शुद्ध अष्टमी ते चैत्र पौर्णिमा या काळात श्री देवी महालक्ष्मीचा रथोत्सव साजरा होतो. अशाच प्रकारचा रथोत्सव मुरूड, आंजर्ले, वेळास येथेही साजरा होतो. मात्र केळशी येथे साजरा होणारा रथोत्सव हा अधिक भव्यदिव्य असतो असे श्रीनिवास घैसास सांगतात. रथोत्सवाचा प्रारंभ किर्तनाने होतो.हे किर्तन कथन करण्याचा मानही येथील घैसास कुटुंबियांकडेच आहे. श्रीनिवास घैसास यांचे वडील भार्गव घैसास यांनीही अनेक वर्षे या रथोत्सव काळात मंदिरात किर्तन सादर केले आहे. आज हा किर्तनाचा कार्यक्रम श्रीनिवास घैसास हे करतात. चैत्र शुद्ध अष्टमीच्या रात्री साधारण तीन ते चार वाजता हा किर्तनाचा कार्यक्रम साजरा होतो. या रथोत्सवास जशी शेकडो वर्षांची परंपरा आहे, तशीच तशीच ती या किर्तनासही आहे. पहाटसमयीचे एकंदरीत आल्हाददायक व शांत वातावरण, येथील शेतकरीबहुल परासरातील लोकांना दिवसभर शेतीची कामे आटोपून घरी आल्यावर रात्री पुरेशी झोप, आराम लाभल्यावर पहाटेच्या शांत व मंगल वातावरणात अष्टमीच्या रात्री चंद्राच्या शितल चांदण्याच्या उजेडात भाविक जनांस मंदिरात येणेजाणे सुलभ व्हावे असाही विचार असावा. रथोत्सवाचा प्रारंभ अशा पहाटेच्या वेळेस होत असला तरी आजमितीस कधीही कोणा ग्रामस्थास किंवा भक्तजनांस सर्पदंश किंवा कोणताही वाईट प्रसंग ओढवलेला नाही ही श्री देवी महालक्ष्मीची कृपाछायाच आहे असे म्हणावे लागेल. गेल्या अनेक वर्षांपासून केवळ एका वर्षाचा अपवाद वगळता भार्गव घैसास कुटुंबिय येथे अविरत किर्तन सेवा सादर करीत आहेत.

रथोत्सव काळात की देवी महालक्ष्मीचा रथ वाहणारे भोई वडिलोपार्जित ठरलेले असले तरी गावातील सर्व जाती जमातीच्या लोकांना या रथास खांदा लावण्याची संधी लाभते. रथोत्सव काळात कोणत्या समाजाने कोणती कामे करावीत, महाप्रसादाची व्यवस्था कोणी पहावी, गावातील मानकरी कुटुंबांस आमंत्रणे कोणी द्यावीत, जमीन कोणी करावी, सारवण कोणी काढावे, देवीची वस्त्रे कोणी धुवावीत वगैरे सर्व कामांची वाटणी आधीच झालेली असून पिढीजात पद्धतीने ती पुढे चालत आली आहे. येथील श्री देवी महालक्ष्मीचा रथोत्सव, रथाच्या 'खेचाखेचीचा खेळ', महाप्रसाद आदींचा आस्वाद घेण्यासाठी संपूर्ण महाराष्ट्रातील भक्तजन केळशी येथे येतात.

केळशी गावात बारापगड जातीचे, धर्मांचे लोक गेल्या शेकडो वर्षांपासून गुण्यागोविंदाने नांदत आहेत. गावात साधारण सतरा ते अठरा आळ्या किंवा वस्त्या आहेत. गावात भौगोलिक मानाच्या अशा सर्व मुलभूत सोईसुविधा उपलब्ध आहेत. गावात प्राचीन काळापासून चालत आलेली बाजारपेठ आहे. प्राथमिक शाळा, माध्यमिक विद्यालय, कनिष्ठ महाविद्यालय आहे. शासकीय आरोग्य केंद्र व खाजगी दवाखान्यांची सुविधा आहे. येथील वर उल्लेख केलेल्या दोन प्रसिद्ध ठिकाणांबरोबरच प्रसिद्ध वाळुची टेकडी व नितांत सुंदर समुद्र किनारा ही देखील पर्यटकांची आकर्षण स्थळे आहेत. येथील अनेक ठिकाणांचा आस्वाद व प्रत्यक्ष घेण्यासाठी संपूर्ण वर्षभरात हजारो देशी, विदेशी पर्यटक केळशी गावास भेट देतात. केळशी गाव हे गेल्या कित्येक वर्षांपासून टुरिस्ट लोकांसाठीचा 'हॉटस्पॉट' आहे. मुंबई, पुण्यासारख्या शहरातून केळशी गावात येण्यासाठी दापोली शहराचा वळसा मारण्याची गरज नाही. दापोलीकडे न वळता थेट मंडणगड, पणदेरी मार्गे अगदी जवळच्या अंतराने केळशी गावात येणे शक्य आहे. या मार्गाने महाराष्ट्र परिवहन मंडळाची बससेवा व खाजगी बससुविधाही उपलब्ध आहे. गावातच निवास,न्याहरी व भोजनासाठींचे विविध पर्याय उपलब्ध आहेत. दापोली तालुक्यातील जितकी विविध पर्यटनस्थळे आहेत, त्यांमध्ये भक्तजन व पर्यटकांच्या पहिल्या पसंतीचे हे केळशी गाव आहे.





# कायद्याचे बोलूया!



श्रीनिवास भार्गवराम घैसास,
वकील- उच्च न्यायालय व नोटरी-
भारत सरकार
भ्रमणध्वनी- 9869080714.

## अपार्टमेंट आणि गृहनिर्माण संस्था यामधील महत्त्वाचा फरक आणि त्याचे परिणाम!



एखाद्या बिल्डरने एखादी इमारत बांधली की त्यामधील सदनिका, गाळे, दुकाने, गोडाऊन आदींची विक्री बिल्डर करतो त्यासाठी रीतसर करारनामा करून आवश्यक ते मुद्रां रवक शुल्क भरून करारनामा करणे आवश्यक असते. मात्र संपूर्ण इमारत पूर्ण झाल्यावर व तिला भोगवटा प्रमाणपत्र मिळाल्यावर त्या इमारती खालील जमिनीचा हस्तांतरण करणे देखील तितकेच महत्त्वाचे असते यालाच कन्व्हेन्स असे म्हणतात. कित्येक वेळेला ही जबाबदारी बिल्डर पार पाडत नाहित आणि त्यामुळेच जेव्हा इमारत मोडकळीला येते तेव्हा मालकीचा प्रश्न निर्माण होतो आणि मग इमारतीतील रहिवाशांना नाहक त्रास सोसावा लागतो हा सर्व त्रास होऊ नये व बिल्डर, विकासक, जमीन मालक व त्यांचे वारसदार यांची मनमानी चालू नये म्हणून शासनाने डीम कन्व्हेन्स ही संकल्पना पुढे आणली आणि आता ती देखील मूळ धरू लागली आहे. पुष्कळ वेळेला अशा प्रकारे इमारत पूर्ण झाल्यावर बिल्डर एक तर सोसायटी स्थापन करतो किंवा अपार्टमेंट स्थापन करतो त्यावेळेला सर्वसामान्य माणसाला यातील फरक समजत नाही दोन्ही प्रकारात दैनंदिन व्यवहार हे एक सारखेच चालू असतात म्हणूनच ढोबळमानाने त्यांच्यामध्ये असणारे फरक हे आपण जाणून घेणार आहोत जेणेकरून त्याबद्दलच्या आपल्या संकल्पना स्पष्ट होतील.

सर्वप्रथम म्हणजे रेरा कायद्यातील कलम 11 (4)(ई) प्रमाणे बहुसंख्य युनिट बुक झाल्यावर तीन महिन्याच्या आत इमारतीतील रहिवाशांची गृहनिर्माण संस्था अथवा अपार्टमेंट असोसिएशन स्थापन करणे त्याच्यावर कायद्याने बंधनकारक आहे. याशिवाय कलम 17 प्रमाणे भोगवटा प्रमाणपत्र मिळाल्यावर तीन महिन्यांचे आत कन्व्हेन्स करून देण्याची जबाबदारी देखील बिल्डर प्रमोटर यांच्यावर आहे.

आता आपण अपार्टमेंट आणि सोसायटी यामधील महत्त्वाचा फरक पाहूया

१) अपार्टमेंट मध्ये प्रत्येक युनिट हे स्वतंत्र असून ते हस्तांतरितकरता येते अपार्टमेंट मालकाचा त्यावर पूर्ण अधिकार असतो अपार्टमेंट मालकाच्या क्षेत्रफळाच्या अनुषंगाने त्याला इमारती खालील जमिनीवर देखील हक्क प्राप्त होतो. गृहनिर्माण संस्थेच्या बाबतीत मात्र जमीन व इमारत ही गृहनिर्माण संस्थेच्या मालकीची असते व सदस्याला भोगवटादार म्हणून त्याचा वापर करता येतो.

२)गृहनिर्माण संस्थेमध्ये कन्व्हेन्स अथवा डीम कन्व्हेन्स झाल्यावर इमारत आणि बिल्डिंग ही गृहनिर्माण संस्थेच्या मालकीची होते. त्यातील एखादी सदनिका विकली गेली व एखादा सदस्य बदलला तरी गृहनिर्माण संस्थेच्या मालकी हक्कांमध्ये काही फरक होत नाही. अपार्टमेंटच्या बाबतीत प्रत्येक अपार्टमेंट धारकाला त्या अपार्टमेंटचा पूर्ण मालकी हक्क प्राप्त होतो.

३) अपार्टमेंट मधील अपार्टमेंट धारकांची असोसिएशन स्थापन केली जाते प्रत्येक अपार्टमेंट धारक हा त्याचा नाममात्र सदस्य असतो.

४) अपार्टमेंट मध्ये सामायिक खर्च हा प्रत्येक अपार्टमेंटच्या क्षेत्रफळावर अवलंबून असतो गृहनिर्माण संस्थेसारखे सामायिक खर्च सर्वांना समान नसतात.

५) गृहनिर्माण संस्थेमध्ये एखाद्या सदस्याने आपली सदनिका, गाळा, दुकान विकले तर गृहनिर्माण संस्था त्या ठिकाणी हस्तांतरण शुल्क आकारू शकते. अपार्टमेंटच्या बाबतीत असा व्यवहार झाल्यास त्या ठिकाणी ट्रान्सफर फी आकारण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

६) गृहनिर्माण संस्थेत एखादी सदनिका भाड्याने दिल्यास त्या ठिकाणी बिन भोगवटा शुल्क आकारता येते. अपार्टमेंटच्या बाबतीत अशा प्रकारचे शुल्क आकारता येत नाही.

७) अपार्टमेंट मध्ये सामायिक सोयी सुविधांबरोबर डीड ऑफ डिक्लेरेशन मध्ये वेगळा उल्लेख केला असल्यास उदाहरणार्थ जायचा यायचा वेगळा रस्ता, गच्चीचा काही भाग इत्यादी या गोष्टी त्या अपार्टमेंट होल्डरला राखीव म्हणून ठेवता येतात. मात्र गृहनिर्माण संस्थेच्या बाबतीत असा फरक करता येत नाही.

८) गृहनिर्माण संस्थेमध्ये नॉमिनेशन करणे सक्तीचे आहे तर अपार्टमेंट मध्ये नॉमिनेशन सक्तीचे नाही.

९) अपार्टमेंट मध्ये जागेच्या आकारानुसार मतदानाचा अधिकार ठरतो गृहनिर्माण संस्थेमध्ये तो सर्वांना समान असतो.

१०) अपार्टमेंट डीड जर बिल्डरने करून दिले नाही तर सिव्हिल कोर्टमध्ये दावा लावून ते कोर्टा मार्फत करून घेता येते तर गृहनिर्माण संस्था ही जर बिल्डरने स्थापन केली नाही तर नॉन को-ऑपरेटिव बेसिस वर खरेदीदार गृहनिर्माण संस्था स्थापन करू शकतात.

११) इमारतीच्या पुनर्विकासा संबंधी शासनाने जी नियमावली लागू केली आहे ती गृहनिर्माण संस्थांना लागू होते ती अपार्टमेंट ना लागू होत नाही. याप्रमाणे अपार्टमेंट व गृह निर्माण संस्था यामध्ये फरक आहे मात्र या दोन्ही ठिकाणी एक गोष्ट मात्र समान आहे ती म्हणजे कायद्यामधील नवीन सुधारणेनुसार गृहनिर्माण संस्थेप्रमाणे अपार्टमेंट मेंटेनन्स वसुलीसाठी सहकार उपनिबंधकांकडे दाद मागता येऊ शकते शेवटी अपार्टमेंट व गृहनिर्माण संस्था यांचे स्वतःचे असे काही फायदे व तोटे आहेत त्यामुळे अमुक एकच संस्था चांगली अथवा वाईट ठरवता येत नाही. मात्र दोन्ही ठिकाणी आपण स्वतंत्र घर घेऊ शकत नाही त्यामुळे आपणाला सामायिक घरामध्ये राहावे लागत आहे याची जाणीव अपार्टमेंट धारक व गृहनिर्माण संस्थेच्या सदस्यानी ठेवली तर पुष्कळशा गोष्टी सुकर होऊन आपापसामधील वादांचे कारणच नाहीसे होईल. अपार्टमेंट व गृहनिर्माण संस्था यातील फरक सर्वसामान्य माणसाच्या लक्षात यावा यासाठीच हा लेख प्रपंच! इति

# कौतुकाने ऊर्जा मिळते

## मनाचिये गुंति...



सुभाष भाऊ चोपडे,
पाचल, ता. राजापूर.

कौतुक, शाबासकी यासाठी प्रत्येक जीव आसुसलेला असतो.एखाद्याचे दिलखुलास कौतुक करता येणे हे खरतर मोठ्या मनाचे लक्षण आहे.आईने बाळाचे केलेले कोडकौतुक ऐकून स्वर्ग मुठीत आल्याचं समाधान बाळाच्या डोळ्यात दिसत असत.आजी आजोबांनी नातवंडांचे केलेले कौतुक त्यांना जगण्याचं बळ देत असत.आज मात्र दुर्दैवाने कौतुकाचे दोन शब्द बोलणारी माणसं दुर्मिळ झाली की काय?असा न राहवून प्रश्न पडतो.का एखाद्याच्या चांगुलपणाच्या वृत्तीचे आपल्याला कौतुक करावेसे वाटत नाही?

एकदा मनापासून कोणाच्यातरी चांगल्या आचाराचे,चांगल्या विचाराचे कौतुक करून पहा .ज्याचे कौतुक केलात त्याच्या डोळ्यातला आनंद,त्यातल समाधान तुम्हाला जाणवेल. घरातल्या प्रत्येकाला आपल्या कुटुंबातील सदस्यांच्या चांगल्या कामाचे कौतुक वाटायला हवेच. जर घरातल्या माणसांनाच कौतुक नसेल तर दुसऱ्यांना कसे वाटेल? शेजाऱ्याच्या प्रगतीचे, त्यांच्या घरातील चांगल्या संस्कारांचे तोंडभरून कौतुक करा ना !की त्याच्या वाईटपणावर आपल समाधान शोधायचं?



सफाई कामगारांनी तुम्ही केलेली घाण स्वच्छ करायची. कधीतरी त्याने वाहिलेल्या घामाच्या धारा पाहून थंडगार पाण्याचा तांब्या त्याच्या समोर धरून पहा क्षणार्धात त्याचा शीण कुठल्या कुठं पळून जाईल. गावात काम करणाऱ्या एखाद्या कर्मचाऱ्याच्या योग्य कामाचे चार लोकांनी मिळून मनापासून कौतुक करून पहा मग बघा तोच कर्मचारी तुमच्या गावासाठी कसा रात्रंदिवस राबतो ते. शिक्षकांनी विद्यार्थ्यांनी केलेल्या कामाचे कौतुक पाहून ह्या देशाला कितीतरी रत्ने मिळाली. तुमच्या दोन गोड शब्दांनी, शाबासकीच्या थापेने एखाद्याचे आयुष्य घडू शकते. आपल्या सहकाऱ्यांच्या कार्याचे,नवीन गोष्टींचे कौतुक करून पहा त्याला नवनवीन करायला त्याला प्रवृत्त करेल. कुणाच्यातरी गाण्याचे, कुणाच्यातरी बोलण्याचे, कुणाच्यातरी लेखणीचे, कुणाच्यातरी वागण्याचे खरंच मनापासून कौतुक करून पहा त्याला जगण्याची ऊर्जा मिळेल. कुणालातरी ऊर्जा देण्याचं मनापासून काम करूया.हे जग खूप सुंदर आहे ते आपण अजून सुंदर करूया.

कोणाला कौतुक आवडत नाही? प्रत्येकाला ते आवडत असत पण कौतुक करावस वाटलं अस आपलं कर्म पण तसच हवं ना? जेंव्हा तुम्ही मनापासून चांगल्या विचारांचे, आचारांचे,संस्कारांचे तोंडभरून कौतुक केलात ना तर तुमच्या चांगुलपणाचे नक्की कौतुक होईल जे तुम्हाला एक नवी जगण्याची ऊर्जा देईल. चला तर मग,आपल्या कौतुकाच्या चार शब्दांनी ऊर्जा देण्याचं पुण्याचं काम करूया.

# शास्त्रांची उपयोजकता - ज्योतिष व वास्तु

## अध्यात्म



ज्योतिर्विद उदय दुदवडकर,
बुरंबावडे- देवगड
मो.८३९००५३९८४

शास्त्र ही एक व्यापक संकल्पना आहे. तिची व्याप्ती फार मोठी आहे. मागील भागात आपण शास्त्राच्या संकल्पनेबाबत अंशतः समजून घेतले आहे. भौतिकशास्त्र आणि अध्यात्मशास्त्र यांबाबत विवेचन केले आहे. भौतिकशास्त्राचे सिद्धांत हे बाह्येंद्रीये यांच्याद्वारे होणाऱ्या ज्ञानाने ठरत असतात तर अध्यात्मशास्त्राचे सिद्धांत हे अतींद्रियांद्वारे (आंतर इंद्रियांद्वारे) होणाऱ्या ज्ञानाने ठरत असतात. त्यांचे सिद्धतेचे प्रमाण हे अनुक्रमे बाह्येंद्रीये व आंतरेंद्रिये (अतिन्द्रिये) यांच्या पातळीवर व सापेक्ष मिळते हे आपण जाणले.

मानवी जीवनाच्या सार्थकतेसाठी आणि उन्नतीसाठी शास्त्रांची उपयोजकता अत्यंत महत्त्वाची आहे. प्रपंचातून परमार्थ आणि परमार्थासाठी प्रपंच साधणे हे मानवाचे परम कर्तव्य ठरत असते शिवाय हे त्याच्या परमहिताचेही असते असे अनेक शास्त्रे सांगतात. विविध अंगांची विविध शास्त्रे आहेत. आपल्या भारतीय पद्धतीत योगशास्त्र, वास्तुशास्त्र, ज्योतिषशास्त्र, संगीतशास्त्र आणि आयुर्वेद या पाच उपायशास्त्रांचा स्वतंत्र विकास केला गेला आहे. खरेतर ही पाच शास्त्रे सत्याच्या आंतरिक बंधाने एकमेकांशी जोडलेली आहेत मात्र या शास्त्रांचा स्वतंत्र विकास होत असताना या पाच शास्त्रांना जोडणारा ' सत्याचा आंतरिक बंध ' मात्र हरवून गेल्याची खंत अनेक सामाजिक भान असणारे तज्ज्ञ अभिव्यक्त करताना आढळतात. यामुळे एखाद्या शास्त्रात तज्ज्ञ असणारी व्यक्ती ही दुसऱ्या शास्त्राला कमी लेखते किंवा इतर शास्त्रांची हेटाळणी करते उदाहरणार्थ एखादा योगी पुरुष योगशास्त्र सोडून वास्तू व ज्योतिष या शास्त्रांची हेटाळणी करताना दिसते. एखादा ज्योतिषी वैद्यकशास्त्र व योगशास्त्राला कमी लेखताना दिसते. एखाद्या शास्त्राचा आपल्याला अभ्यास नसेल तर त्या शास्त्राचे मूल्यमापन करण्याचा किंवा त्या शास्त्राचा दर्जा ठरवण्याचा किंवा ते शास्त्र थोतांड आहे हे ठरवण्याचा आपल्याला काय अधिकार? शास्त्र मानणाऱ्यांनी अंधश्रद्धा न स्वीकारणाऱ्यांनी, डोळसपणे प्रपंच आणि परमार्थ साधणाऱ्यांनी आपल्या भारतीय योगशास्त्र, वास्तुशास्त्र, ज्योतिषशास्त्र, संगीतशास्त्र आणि आयुर्वेद या पाच शास्त्रातून वाहणाऱ्या एकाच सत्याच्या अंतःप्रवाहाचे भान राखायला हवे. प्रत्यक्षात भृगु, अत्री, वसिष्ठ, पाराशर, वेदव्यास यांसारख्या त्रिकालज्ञानी महर्षींनी या पाचही उपायशास्त्रांची मानवी जीवनात उपयोजकता साधता यावी यासाठी काही विशिष्ट हेतू मनात ठेवून निर्मिती केलेली आहे. त्यातील एक शास्त्र खरे आहे व दुसरे खोटे आहे असे म्हणणे हे अज्ञानमूलक, बालिशपणाचे लक्षण ठरेल.

दोन शास्त्रांतून वाहणाऱ्या सत्याच्या एकाच अंतःप्रवाहाचे भान राखून मूलतः वास्तू आणि ज्योतिष या दोन अलग वाटणाऱ्या विषयांची सांगड आणि बांधणी ' फेंगशुई ' या चिनी वास्तुशास्त्रात फार उत्तम प्रकारे केलेली आढळते. घट, घटना आणि घटाकार यांचे सुस्वरूप 'उडता तारा पद्धती (flying star system) ' सारख्या विकसित केलेल्या पद्धतीत पाहायला मिळते असे विख्यात वास्तू विद्यावाचस्पती डॉ. नरेंद्र सहस्त्रबुद्धे यांनी ' वास्तु ज्योतिष (संहिता-सिद्धांत-सिद्धी) ' या ग्रंथातील आपल्या मनोगतात म्हटले आहे.


मानवाला आपल्या जीवनात आपल्या जन्माचे कार्यकारण कळणे तसेच आपल्या कर्माच्या आणि धर्माच्या दशा आणि दिशा कळणे आवश्यक असल्याचे समर्थन श्रीमद्भगवद्गीतेने केले आहे. याचीच पुष्टी ज्योतिषशास्त्रात आणि हस्तरेषाशास्त्रात केलेली आहे. पृथ्वीभोवती अवकाशाच्या वर्तुळाकाराचे १२ भाग केलेले आहेत. या भागांना राशी असे संबोधले आहे. हे १२ भाग म्हणजेच मेष, वृषभ, मिथुन, कर्क, सिंह, कन्या, तूळ, वृश्चिक, धनु, मकर, कुंभ आणि मीन या १२ राशी होत. याच अवकाशाच्या वर्तुळाकाराचे वेगळे असे आणखी २७ उपविभाग केलेले आहेत ज्यांना ' नक्षत्रे ' असे संबोधले जाते. अश्विनी, भरणी, कृतिका, रोहिणी, मृगशीर्ष, आर्द्रा, पुनर्वसू, पुष्य, आश्लेषा, मघा, पूर्वा फाल्गुनी, उत्तरा फाल्गुनी, हस्त, चित्रा, स्वाती, विशाखा, अनुराधा, ज्येष्ठा, मूळ, पुर्वाषाढा, उत्तराषाढा, श्रवण, धनिष्ठा, शततारका, पूर्वाभाद्रपदा, उत्तराभाद्रपदा, आणि रेवती अशी ही २७ नक्षत्रे आहेत. त्याहीपुढे जावून अवकाशाच्या वर्तुळाचे आणखी १०८ भाग केलेले आहेत ज्यांना ' नक्षत्रांची चरणे ' असे संबोधले आहे. जपमाळेतल्या १०८ मण्यांचा याच्याशी संबंध आहे. १०८ वेळा केलेला मंत्रजप हा ब्रम्हांडाच्या एकूण १०८ चरणांवर समर्पित होत असतो. एक माळेचा जप म्हणजे ब्रम्हांडाभोवती एक प्रदक्षिणा असे मानले जाते. एका राशीच्या कक्षेत नऊ चरणे तर एका नक्षत्राच्या कक्षेत चार चरणे अशी या नक्षत्रांच्या चरणांची विभागणी केलेली आहे. प्रत्येक नक्षत्र चरणावर एक नादब्रह्ममय उच्चाराचे अक्षर स्थापित असते. या अक्षरांचे उच्चारण व्यक्तीच्या नावात करण्याची (जन्मराशीतील नक्षत्रचरणांच्या संबंधित अक्षरांवरून नाव ठेवणे) रीत प्रचलित आहे पृथ्वीच्या परिवलन आणि परिभ्रमण या गतींमुळे अवकाशातील ग्रह, तारे हे राशी, नक्षत्रे आणि नक्षत्रांची चरणे यांमधून प्रवास करताना कालांतराने विविध राशींमध्ये, नक्षत्रांमध्ये आणि नक्षत्र चरणांमध्ये त्यांची स्थानांतरणे होत असताना दिसते.

व्यक्तीची जन्मकुंडली म्हणजे व्यक्तीच्या जन्माच्या वेळी ग्रह, राशी आणि नक्षत्रे यांची जी सांगड झालेली असते त्याचे सूक्ष्म असे बीज स्वरूप अवकाशात पडलेले प्रतिबिंब असते. ही जन्म कुंडली म्हणून व्यक्तीच्या जन्माच्या वेळी जन्म तिथे झाला त्या स्थानापरत्वे आकाशात वावरणाऱ्या ग्रहांचा दिशा सापेक्ष नकाशा होय. हे बीज स्वरूप प्रतिबिंब जन्मापासून मृत्यूपर्यंत त्या व्यक्तीच्या जीवाशी आणि जीवनाशी जोडलेले राहते. बाह्य गोचर ग्रहांच्या बदलत जाणाऱ्या स्थितीचे या बीज स्वरूप जन्मपत्रिकेच्या आराखड्याशी ज्याप्रमाणे कालांतराने योग होत असतात तसेच नक्षत्रांच्या तेजोवलयांचा ज्याप्रमाणे संयोग होतो त्याप्रमाणे जीवनात सुख व दुःख यांचा अनुभव व्यक्तीला येत असतो. ग्रहांच्या कालसापेक्ष दशांनुसार या सुखदुःखाची अनुभूती काळाच्या अंतराने माणसाला येत असते.

व्यक्ती आणि समष्टी यांच्यामध्ये वास्तु हे एक असे माध्यम आहे की, ज्यामुळे बाह्यग्रह, नक्षत्रांच्या कुयोगांची अशुभ ऊर्जा शोषून घेतली जाते आणि वास्तूमध्ये वावरणाऱ्या व्यक्तीवर तिचा प्रभाव कमी पडतो किंवा टळतो जसे की, छत्रीच्या आधाराने अनपेक्षित असणारे पावसातील भिजणे कमी होते किंवा टळते. वास्तुशास्त्रानुसार वास्तूमध्ये ऊर्जेचा एक मंडळाकार विस्तार होत असतो जो वास्तूमधील व्यक्तीच्या सभोवती ऊर्जेचा महाकोष विणतो. या महाकोषामुळे अंतरिक सूक्ष्म बीज स्वरूप ग्रह-नक्षत्रांच्या आराखड्यातील म्हणजेच जन्मपत्रिकेतील विष किंवा अशुभत्व शोषले जाते तसेच अमृत किंवा शुभत्व वास्तुमध्ये नांदविले जाते. या अविष्काराची जाण महर्षींना असल्यामुळेच या जाणिवेच्यायोगे त्यांनी माणसाच्या प्रारब्धाच्या अर्थात भाग्याच्या व्यवस्थापनेसाठी (Destiny Management) योगशास्त्र, ज्योतिषशास्त्र व वास्तुशास्त्र यांची निर्मिती केली. योगशास्त्र यामध्ये भाग्याचे व्यवस्थापन साधण्यासाठी प्राणतत्व आकाशाचा माध्यम म्हणून उपयोग केलेला आहे. वास्तुशास्त्रामध्ये भूमी म्हणजे पृथ्वीतत्वाचा माध्यम म्हणून उपयोग केलेला आहे. ज्योतिषशास्त्रामध्ये ग्रहगती, पाच तत्त्वे (पंचतत्वे) आणि तीन गुण (त्रिगुण) यांचा अर्थात अष्टधा प्रकृतीचा माध्यम म्हणून उपयोग केलेला आहे यामध्ये खगोल आणि भूगोल यांचा सापेक्ष विचार आहे.

' कामदं मोक्षदं ' असे ' प्रणव ' हे आधी इच्छापूर्ती करणारे व नंतर मोक्षाच्या मार्गाकडे नेणारे माध्यम आहे. ज्या ठिकाणी ऊर्जेचा मंडलाकार अविष्कार होतो त्या ठिकाणी प्रणवाचे स्पंदन निर्माण होते व त्या ठिकाणी इच्छापूर्तीचा अनुभव येतो असा वास्तू आणि योगशास्त्राचा मूलभूत सिद्धांत आहे. योगांसंदर्भात माहितीज्ञ घेझताना आपण पाहिले की योगशास्त्रामध्ये प्राणतत्वाच्या आधारे ऊर्जा अविष्काराची मांडणी होत असते. वास्तुशास्त्रामध्ये पृथ्वी तत्वाच्या आधारे ऊर्जा आविष्काराची मांडणी होत असते. योगशास्त्राच्या योगाने अंतरावकाशात गुणोत्कर्ष केला जातो तर वास्तुशास्त्राच्या योगाने बाह्य अवकाशात म्हणजे सभोवताली, अवतीभवती गुणोत्कर्ष केला जातो.

(उर्वरित पुढील भागात)



# त्यांची गोष्ट

## तिचा गौरव



चित्रा अविनाश नानिवडेकर,
सफाळे- पालघर.
मो. 9969669523

त्यांचं नाव...काहीही असू शकत.. सुनंदाताई, शोभाताई...किंवा शर्मिलाताई. आत्ता साठीच्या पुढच्या. गाव, प्रदेश कुठचाही... तळ कोकणापासून ते कोणताही विभाग. विभाग महत्त्वाचा नाही. माझ्या मावशीच्या नात्यातल्या एक सुनंदाताई. आत्ता साधारण साठीच्या पुढे असतील. झालं असं की एका अपघातामध्ये दुर्दैवाने त्यांचे पती गेले. पदरी एक सात वर्षांची मुलगी. आमच्या छोट्याशा गावामध्ये खूप हळहळ वाटली सगळ्यांना. नातेवाईक, सगेसोयरे काही दिवस राहून गेले.पतीच्या कंपनीतून अवघी काही हजाराची रक्कम मिळाली. ती सहा आठ महिन्यात संपली.

गावातील लोकं सुनंदा बाईंना धीर देत होते कोणी त्यांना पैशाची मदत करे, कोणी त्यांना रेशन आणून दे.त्यांच्या मुलीचे शाळेचे कपडे तसेच इतर शैक्षणिक वस्तू दिल्या. परंतु सुनंदाबाई केवळ काही महिन्यातच ह्या सगळ्या परिस्थितीचा विचार करता खूप म्हणजे खूपच सावरल्या.ताठ मानेने उभ्या राहिल्या. कधीकाळी त्यांनी थोडसं शिवणाचं काम केलं होतं. सहा महिन्यानंतर त्यांनी या शिवण्याच्या कलेचा उपयोग करायचा ठरवला. एका सदग्रहस्थाने त्यांना आपल्या दुकानात एक मशीन दिलं.अक्षरशः घरोघरी जाऊन शिवण्याची काम घेऊन येत असत आणि वेळेवरती नेऊन देत. असतो कोणाकडे काही परिस्थिती आली. ह्या धावून जाणार. नातेवाईक आपल्या अडी अडचणीला त्यांना बोलावित. त्या आपुलकीने जात. पण कोणाहीकडे मिंधेपणाने हात पसरत नसत. तसं वय तरुणच होतं. आणीबाणीचे खूप प्रसंग आले . पण कणखर मनाने त्यांनी परतवून लावले. गावानेसुद्धा त्यांना साथ दिली. मुलीला तालुक्याच्या गावात शिक्षणाला जावं लागे. स्वतः तिला बस पर्यंत सोडून घ्यायला जायच्या.तिला पदवीधर केली. तिने एका कंपनीमध्ये नोकरी मिळवली. आता जरा उसंत घ्या असं सगळे म्हणू लागले. पण सुनंदाताईंना तिच्या लग्नाचे वेध लागले. नशिबाने एका चांगल्या घरातून तिला मागणं आलं. त्यांनी काहीच अपेक्षा न ठेवता मागणी घातली. मुलगा निर्व्यसनी आणि परिस्थितीची जाणीव असणारा होता. सुनंदाताईंनी नातलगांना बोलावून सोनालीचं कन्यादान केलं.

खरंच एका बाईने कणखरपणे उभं राहायचं ठरवलं तर काय नाही करू शकत. आपला बाणा आणि कणा प्रखर जपत आज सुद्धा त्या शिवण टिपण, प्रसंगी स्वयंपाकाची कामं, डबे करून देणं करतात.

मी लेखाच्या सुरुवातीला म्हटल्या प्रमाणे अश्या सुनंदाताई तुमच्या आसपास सुद्धा असणार आहेत. स्वतंत्र बाणा जपून आपल्या जोडीदाराच्या जाण्या नंतर आपले घरटे सावरून जगाला दाखवून देणाऱ्या...अश्या महिलांना आपण सुद्धा थोडीशी मदत करूया. त्यांना पैशांची अपेक्षा नक्कीच नसते. कोणीतरी कौतुकाची थाप पाठीवर देण्याची गरज असते. त्यांची कथा मला नक्की ऐकायला आवडेल. आपल्या अभिप्रायाची वाट बघतेय.

## सोनेरी दुनिया



श्री. श्रीराम शेटये.
नालासोपारा.

## अभिनय आणि नृत्य सम्राज्ञी जयश्री गडकर

माणसाचे भाग्य तरी किती बलशाली असावे? अवघ्या बारा वर्षाचे वय माझे पण सर्व काही स्वप्नवत घडत होते. माझ्या मध्ये आणि रंगमंचामध्ये अवघे दोन फूटांचे अंतर. समोर नटवर्य नारायण बोडस आहेत. साक्षात नृत्य आणि अभिनय सम्राज्ञी जयश्री गडकर नृत्य गायन आणि अभिनयाने प्रेक्षकांच्या डोळ्यांचे पारणे फेडत आहेत. यापेक्षा मोठे भाग्य ते कोणते. नाटक होते 'गोकूळचा चोर' मातृवत्सल भूमिका होती जयश्री गडकर यांची अप्रतिम गात होत्या त्या. लहान वयातही मी मंत्रमुग्ध झालो होतो. अर्थात इतक्या लहान वयात मला अभिनय आणि गायन काय असते हे काहिच कळत नव्हते.

जयश्रीबाईंच्या त्या नाटकातल्या आठवणी कायमच्या लक्षात राहिल्या. एकोणीसशे ऐंशी ब्याऐंशी वर्ष असावे. चौथी पाचवीला प्राथमिक शाळेत शिकणारा मी. तळकोकणातल्या मालवण तालूक्यातील गोळवण हे आमचे गाव. गावतली वस्ती तिनशे साडेतिनशे घरांची . पण पंचक्रोशीत खबर जायची आणि आजूबाजूच्या गावातील ग्रामस्त बाया,बापडे,पोरटोर गर्दी करायचे. गावात नाटक किंवा पडद्यावरचा सिनेमा असला की प्रचंड उत्साह असायचा. गावात एकही नाट्यगृह अथवा थिएटर नव्हते.
मग प्राथमिक शाळेच्या प्रांगणात नाटक अथवा सिनेमा दाखवले जात असत.

हिंदी आणि मराठी चित्रपट आणि रंगभूमीवर देखील जयश्रीबाईनी अंत्यत ताकदिने अभिनय केला. अभिजात सौंदर्य सुसंकृत अविष्कार , एखाद्या भुमिकेत हुबेहूब शिरण्याची लकब. गायण आणि नृत्यावरही पराकोटीचा पगडा. यामुळेच मराठी चित्रपट सृष्टीत त्या दिर्घकाल कार्यरत राहिल्या.

१९ फेब्रुवारी १९४२ मध्ये कर्नाटक मधील कणसगिरी या छोट्याश्या खेडेगावात जयश्रीबाईंचा जन्म झाला. हे गाव ता. सदाशिवगड, जिल्हा कारवार येथे आहे. लहाणपणीच त्या मुंबईत आल्या. खेतवाडीच्या नगरपालिकेच्या शाळेत प्राथमिक शिक्षण घेतले. गिरगावातील राम मोहन हायस्कुल मधून माध्यमीक शिक्षण घेतले.

निर्माते दिग्दर्शक व्ही. शांताराम यांच्या 'झनक झनक पायल बाजे (१९५५) या गाजलेल्या चित्रपटात नायीका संध्या यांच्याबरोबरच एका समुह नृत्यात काम करण्याची संधी त्यांना मिळाली. रशियाचे नेते न्यिकित खुश्र्वाव्ह हे भारतात आले असता त्यांच्यासाठी सादर केलेल्या एका कार्यक्रमात त्यांनी 'लटपट लटपट तुझं चालणं' या गाण्यावर नृत्य केले होते. त्याची छायाचित्रे प्रसिद्ध निर्माता दिग्दर्शक दिनकर पाटील यांनी पाहिली आणि त्यांनी 'दिसते तस नसतं' या चित्रपटात त्यांनी जयश्री गडकर यांना नृत्याची संधी दिली. हा त्यांचा खर्याअर्थी पहिला चित्रपट ठरला.

नंतर त्यांनी मागे वळून पाहिले नाही. भालजी पेंढारकर यांची निर्मिती असणार्या राजा परांजपे दिग्दर्शित 'गाठ पडली ठका ठका' (१९५६), या चित्रपटात जयश्रीबाईना नायीका म्हणून प्रथम संधी मिळाली. या चित्रपटात बाबूराव पेंढारकर, राजा गोसावी, रमेश देव,गणपत पाटील अशा दिग्गज कलाकारांसोबत काम करण्याची संधी जयश्रीबाईंना मिळाली.यानंतर राजा गोसावी यांच्या सोबत'आलीया भोगासी'(१९५७) हा चित्रपट केला '. 'सांगते ऐका'(१९५९) या तमाशाप्रधान चित्रपटात त्यांनी सहाय्यक अभिनेत्रीची भुमिका केली. या चित्रपटात हंसा वाडकर, चंद्रकांत, सुर्यकांत, रत्नमाला, वसंतराव पेहलवान अशा आघाडीच्या कलाकारांसोबत काम करत असताना जयश्रीबाईंच्या अभिनयाचा कस लागला. त्यांची या चित्रपटातील भुमिका दुय्यम असुनही त्यांचे नाव एकदम प्रकाशझोतात आले. हा चित्रपट खुप गाजला पुण्यातल्या विजयानंद चित्रपटगृहात १३२ आठवडे चालून त्याने विक्रम केला. त्यातले 'बुगडी माझी सांडली गं ' हे गाणे विशेष गाजले. जयश्रीबाईंच्या नृत्याविष्कारातील चापल्य आणि अभिनयामुळे हे गीत ईतकी वर्ष उलटली तरी रसिकांच्या स्मरणात आहे.

त्यानंतरही त्यांच्या ' सवाल माझा ऐका' (१९६१) व 'मल्हारी मार्तण्ड' या तमाशाप्रधान चित्रपटांना खुप प्रसिद्धी मिळाली. त्यातील भुमिकेचेही खुप कौतूक झाले. या दोन्ही चित्रपटातील 'सोळाव वरीस धोक्याचं' ,'कस काय पाटील बर हाय का?', 'फड सांभाळ तुर्या ला गं आला' ,' पदरावरती जरतारीचा मोर नाचरा हवा' या लावण्या जयश्रीबाईंनी आपल्या अमर्याद नृत्याविष्कार आणि अभिनयाने अजरामर केल्या.

. १९६४ साली प्रदर्शीत झालेला 'मानीनी' चित्रपट आला आणि तमाशाप्रधान चित्रपटात काम करण्याचा शिक्काही त्यांनी पुसून टाकला. गरीब पण स्वाभिमानी अशी मालतीची भुमिका त्यांनी अजरामर केली.



## पाऊस-कधी हवासा, कधी नकोसा..!

प्रा.के.एस.शिरबंदे,
दापोली.

मृग नक्षत्र सुरू झाले की मान्सूनचा पाऊस चोर पावलांनी आपल्या अंगणात, शिवारात पैंजण घालून नाचत,नाचत प्रवेश करतो..! त्याचे हे नाचणे मनाला सुखावणारे, आनंद देणारे असते ! एखाद्या अल्लड बालिकेला आनंदाने कडेवर घेऊन नाचावे, इतक्या कौतुकाने आपण सारे जण पहिल्या पावसाचे स्वागत करत असतो..! हाच पाऊस जसा जसा मोठा होऊ लागतो , तसे तो आपले गुण दाखवू लागतो..! काही वेळा त्याचे तांडव नृत्य देखील आपल्याला पहायला मिळते..!

कालपासून पडणारा हा आपला लाडका पाऊस, सुरुवातीला हवाहवासा वाटणारा, आता बाकी त्यांनी आपले रंग दाखवायला सुरुवात केली आहे..! कोकणात सर्वदूर त्यानी कहर केला आहे..! ढगफुटी सारखा पाऊस कोकणात पडतो आहे,कोकणातल्या बाजारपेठेत, रस्त्या रस्त्यावर सर्वत्र पाणीच पाणी झाले आहे, लोकांची दैना उडाली आहे, मुंबईत तर मोठ्या प्रमाणात जनजीवन विस्कळीत झाले आहे..! रायगड किल्ल्यावरही ढगफटी होऊन राणी महालाकडे पायी जाणारा रस्ताच बंद झाला आहे..! अशावेळी हवाहवासा वाटणारा हा लाडका पाऊस नको नकोसा वाटतो..!

मित्रांनो ! आज मी आपल्याला पन्नास वर्षांपूर्वीची माझी एक पावसाळी जीवघेणी आठवण सादर करीत आहे..! अजूनही ती आठवण माझ्या हृदयाच्या एका कप्प्यात,काट्याप्रमाणे खोल रुतून बसली आहे...! ती एक पावसाळी ढगाळ संध्याकाळ होती, त्यावेळी मी सहावी सातवीला असेन आम्ही गल्लीतली पाच-सहा पोरं ऑइल मिलच्या माळावर पतंग उडवायला गेलो होतो..! घरीच बनवलेली ती तीन चार सुंदर रंगीबेरंगी पतंग, त्यादिवशी वाऱ्यावर छान झोके घेऊ लागले होती, आम्ही पतंग उडवण्यात व काटण्यात सारेजण मशगुल असतानाच, अचानक आकाशात काळे ढग दाटून येतात..! जोराचा वारा सुटतो..! विजांचा कडकडाट सुरू होतो..! आमचे पतंग वाऱ्यावर जोरजोरात गिरक्या घेऊ लागतात, जसे की हवेत भरकटलेलं विमान गिरक्या घेऊ लागत, आमचे पतंग वाऱ्यावर केव्हाच तुटून गेलेले असतात, काही झाडांच्या फांद्याला अडकून पडतात तर काही वाऱ्यावर सवार होऊन दिसेनसी होतात..! आम्ही घाबरून, सगळे एकमेकांचे हात धरून ऑइल मिलच्या बिल्डिंगच्या शेड खाली जाऊन थांबतो..! इतक्यात कड कड मोठा आवाज होतो, व क्षणार्धात शेडवरचे पत्रे वादळी वाऱ्याने पत्त्याप्रमाणे आमच्या समोरून उडून जाताना दिसतात..! आम्ही सगळेच घाबरून एकमेकांना घट्ट मिठी मारून बसतो..!

पावसाला धुवांधार सुरुवात होते, सारे अंधारून येते, ढगांचा गडगडाट व विजेचा कडकडाट करत पाऊस आणखीनच जोर धरतो, विजा चमकल्या की पावसाच्या जलधारा प्रकाशमान होऊन, पाऊस आणखीनच भयानक वाटत होता..! त्यावेळी पाऊस थांबायचे नाव घेत नव्हता, पावसाने आम्ही सारे भिजून चिंब झालो होतो..! आमच्याकडे ना छत्री होती, ना रेनकोट..! त्यावेळी एवढी श्रीमंती नव्हती..! आम्ही सारे जण अंगातल्या शर्टाची बटने काढून, तो शर्टच डोक्यावर ओढून घेतला होता..! व कसेबसे डोक्याचे संरक्षण करत होतो..!

मान्सूनचा तो पहिलाच वादळी पाऊस, खूप जोर जोरात बरसल्याने रस्त्यावर पाणीच पाणी झाले होते..! जवळचे सारे ओढे, नाले तुडुंब भरून वहात होते ! आमच्या गावची घरं व ऑइल मिलचा माळ यामध्ये एक मोठा ओढा होता ! त्याला आम्ही थोरला ओढा असे म्हणत असू , त्याच्या बाजूलाच धाकटा ओढाही होता..! त्यादिवशी ढगफुटी होऊन मोठा पाऊस पडला होता, त्यामुळे दोन्ही ओढे दुथडी भरून वाहत होते..! सारी वाहतूक बंद झाली होती..! अजूनही आपली पतंग उडवायला गेलेली पोरं, घरी आली नाहीत म्हणून आमच्या घरची पालक मंडळी घाबरून गेली होती ! ओढ्याचे पाणी कमी होण्याची काही चिन्हे दिसेनात ! शेवटी आमच्या गल्लीतली दोन तरणीबांड पैलवान पोरं, रामा आणि शिवा पुराच्या पाण्यात उड्या घेऊन मोठ्या हिमतीने दोन ओढे पार करून आमच्यापर्यंत येऊन पोहोचले ! आम्हाला ठेवणीतल्या दोन-तीन शिव्या हासडून, इथं कशाला आला होता, म्हणून चांगलाच दम दिला..! आम्ही पण गप्प गुमान त्यांच्या शिव्या ऐकून घेतल्या..! कारण आम्हाला ते सुरक्षित घरी नेणार होते...! शेवटी दोन तासानी ओढ्याचे पाणी कमी झाल्यावर, त्या पैलवानानी आम्हा एकेकाला आपल्या खांद्यावर बसवून दोन ओढें पार करून गावात आणले..!
आम्हा साऱ्या पोरांची वरात घरापर्यंत आली.. ! घरची सारी वडीलधारी मंडळी घाबरली होती..! आम्हाला पाहताच, त्यांच्या जीवात जीव आला, व त्या साऱ्यानीं आम्हाला कडकडून मिठी मारली..! आमच्या घरच्या माणसानी, त्या दोन पैलवानांचे मनापासून आभार मानले.....! आम्हाला बघायला सारी गल्ली जमली होती..! गल्लीतला एक बुजुर्ग कृष्णा मामा आमच्यावर रागाने चांगलाच तुटून पडला, व म्हणाला..! कोंबडीच्यानो...! संध्याकाळचं वारं कौदुळ सुटल्यावर लगेच घरी यायचं असतं का, तिथच बोंबलत बसायचं..! आम्हाला वाटलं, तुम्ही सारी पोरं त्या पतंगा बरोबर उडून गेला की काय ? आता लेकानू ..! यापुढे तुम्ही याद राखा..! पावसाळा संपेपर्यंत इकडं तिकडं कुठे भटकायचं नाही..! आता शाळा सुरू झाल्या हायती, गप्प गुमान साऱ्यांनी शाळेला जायचं..! आणि सुट्टीच्या दिवशी आमच्या बरोबर शेतावर कामाला यायचं..! समजलं..! नाहीतर तुमच्या मास्तराना सांगून, साऱ्यांस्नी नापासच करायला लावतो..! बसा बोंबलत...! अशा तऱ्हेने कृष्णा मामाने त्यादिवशी आम्हाला, आयुष्यभर लक्षात राहील असा चांगला कडवा दम भरला होता..!

**असा हा,मी अनुभवलेला रोमांचक, अंगावर शहारे आणणारा, मनातून नकोसा वाटणारा पाऊस, आयुष्यात कुणाच्याही वाट्याला न येवो हीच ईश्वरचरणी प्रार्थना...!**

# सरकारी योजना/नोकरी

## मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना2024

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना या योजनेमधून मिळणार मनुष्यबळ

शैक्षणिक पात्रतेनुसार ६ हजार, ८ हजार आणि १० हजार प्रती माह विद्यावेतन

राज्यातील युवकांना त्यांच्या शिक्षणानंतर प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण त्यांची नोकरी मिळण्याची क्षमता वाढविण्यासाठी 'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना' महाराष्ट्र शासनाने २०२४-२५ या आर्थिक वर्षापासून सुरु करण्यास मान्यता दिली आहे.

या माध्यमातून उद्योजक, खासगी क्षेत्रातील आस्थापना, सेवा क्षेत्र, केंद्र व राज्य शासनाच्या शासकीय/निमशासकीय आस्थापनांना मनुष्यबळ मिळणार आहे.

**प्रशिक्षणार्थींना १२ वी पास ६ हजार, आयटीआय/पदविका ८ हजार आणि पदवीधर/पदव्युत्तर यांना १० हजार प्रतिमाह विद्यावेतन मिळणार**

- कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभागाने याबाबतचा शासन निर्णय काल प्रकाशित केला आहे. शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्य विभाग आणि मुख्यमंत्री जनकल्याण कक्ष यांच्यामार्फत संयुक्तपणे ही योजना राबविण्यात येणार आहे.

### उमेदवाराची पात्रता

- किमान वय १८ व कमाल ३५ वर्षे असावे. किमान शैक्षणिक पात्रता १२ वी पास/आयटीआय/पदवीका/पदवी/पदव्युत्तर असावी. मात्र, शिक्षण चालू असलेले उमेदवार या योजनेस सहभागास पात्र असणार नाहीत.
- उमेदवार महाराष्ट्राचा रहिवासी असावा. त्याचे आधार नोंदणी असावे.
- बँक खाते आधार संलग्न असावे.
- कौशल्य, रोजगार व उद्योजकता आयुक्तालयाच्या संकेतस्थळावर नोंदणी करुन रोजगार नोंदणी क्रमांक प्राप्त केलेला असावा.

### आस्थापना/उद्योगासाठीची पात्रता

- आस्थापना/उद्योग महाराष्ट्रात कार्यरत असावा. आस्थापना/उद्योगाने कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या संकेतस्थळावर नोंदणी केलेली असावा.
- आस्थापना/उद्योगाची स्थापना किमान ३ वर्षांपूर्वीची असावी.
- आस्थापना/उद्योगानी ईपीएफ, ईएसआयसी, जीएसटी, सर्टीफिकेट ऑफ इन कॉर्पोरेशन, डीपीआयटी व उद्योग आधारची नोंदणी केलेली असावा.
- कार्य प्रशिक्षणाचा कालावधी ६ महिने असेल. या कालावधीसाठी उमेदवारांना शासनामार्फत विद्यावेतन देण्यात येईल.
- या योजनेंतर्गत खासगी क्षेत्रातील आस्थापना/उद्योजकांकडे एकूण कार्यरत मनुष्यबळाच्या १० टक्के व सेवा क्षेत्रासाठी २० टक्के उमेदवार कार्य प्रशिक्षणासाठी घेता येतात.
- केंद्र व राज्य शासनाच्या शासकीय/निमशासकीय आस्थापना/उद्योग/महामंडळ यामध्ये मंजूर पदांच्या ५ टक्के उमेदवार कार्य प्रशिक्षणासाठी घेता येतील.
- जिल्हास्तरीय शल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता जिल्हा कार्यकारी समिती या योजनेचा वेळोवेळी आढावा घेईल.

- **योजनादूत**

- शासनाच्या विविध योजनांची प्रचार प्रसिध्दी करणे व जास्तीत जास्त नागरिकांना योजनेचा लाभ पोहोचविण्यासाठी योजनादूत नेमण्याची योजना सन २०२४-२५ च्या अतिरिक्त अर्थसंकल्पीय अधिवेशनात करण्यात आली आहे.
- त्यानुसार ग्रामीण भागात प्रत्येक ग्रामपंचायतसाठी १ शहरी भागात ५ हजार लोकसंख्येसाठी १ याप्रमाणे एकूण ५० हजार 'योजनादूत' नेमण्यास मान्यता देण्यात आली आहे.
- योजनादूतांचे विद्यावेतनही या योजनेमधून अदा करण्यात येईल.

**हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे**.




Estd. 1962
"A++" Accredited by NAAC (2021) With CGPA 3.52

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**
**दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र**

**एम.बी.ए. (Distance) करिता प्रवेशाची सुवर्णसंधी**

शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ करिता एम.बी.ए. (Distance Mode) या अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्ष प्रवेशाकरिता आवश्यक असणाऱ्या प्रवेश परिक्षेसाठी (Entrance Exam) रिक्त जागांकरिता ऑनलाईन अर्ज मागविणेत येत आहे. त्याकरिता ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम मुदत **गुरुवार, दि.१८ जुलै,२०२४** आहे.

**फेर प्रवेश परीक्षा- रविवार, दि. २१ जुलै, २०२४**

तसेच ज्या विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र शासन अथवा भारत सरकारच्या कोणत्याही सांविधानिक संस्था किंवा ATMA तर्फे घेतल्या जाणाऱ्या व्यवस्थापन (Management) विषयात शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ करिता पदव्युत्तर पदवी प्रवेशासाठी घेण्यात आलेली प्रवेश परीक्षा (CET) उत्तीर्ण झालेले आहेत ; अशा विद्यार्थ्यांना शिवाजी विद्यापीठाच्या 'एम.बी.ए. (Distance)' अभ्यासक्रमाला थेट प्रवेश घेण्याकरिता आवाहन करण्यात येत आहे. अशा पात्र विद्यार्थ्यांना शिवाजी विद्यापीठातर्फे वरीलप्रमाणे घेण्यात येणारी प्रवेश परीक्षा उत्तीर्ण होण्याची अट लागू नसेल याची नोंद घ्यावी. तरी सदरच्या प्रवेशोत्सुक विद्यार्थ्यांनी cde_mba@unishivaji-ac-in या ई-मेल वरती संपर्क साधावा.

तसेच याबाबतची सविस्तर माहिती व सुचना https://www.unishivaji.ac.in/distedu/notice_board.aspx या संकेतस्थळावर पहावी.

**फेर प्रवेश परीक्षेस अर्ज करण्यासाठी खालील QR कोड स्कॅन करा...**

ठिकाण: कोल्हापूर
दिनांक : ०९/०७/२०२४
जा.क्र. सीडीओई/१०२३

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
**कुलसचिव**

**दैनिक सिंधुदुर्ग समाचार(मुख्य आवृत्ती ,सिंधुदुर्ग,)संस्थापक,संपादक,कै.प्राचार्य मुकुंद.कदम MALLB** मालक,मुद्रांक,प्रकाशक ऍंड रुपाली कदम डांगे **BSL,LLB,MCA RNI No.४३७११/८५** मुद्रणस्थळ न्यू विक्रम मुद्रणालय,कोपर्डे,जि .कोल्हापूर, महाराष्ट्र ४१६२०४ येथे छापून प्रकाशनस्थळ/कार्यालय एम/एस् विक्रम मुद्रणालय,१०३ मेन रोड,कणकवली,जिल्हा सिंधुदुर्ग, महाराष्ट्र ४१६००२ येथे प्रकाशित केले. मुद्रणस्थळ: एम/एस् विक्रम मुद्रणालय,१०३ मेन रोड,कणकवली,जिल्हा सिंधुदुर्ग,महाराष्ट्र ४१६००२ .उपसंपादक- विक्रम कदम,कार्यकारी संपादक -प्रा.उज्वला राठोड, डॉ.शर्मिला कदम राजपूत.ई मेल कार्यालयीन पत्रव्यवहार व जाहिरातींसाठी **संपर्क**:**rupasamachar@gmail.com**,बातमी व फोटोंसाठी **संपर्क**:**sindhudurg.samachar@gmail.com** सिंधुदुर्ग -फोन ०२३६७-२३२१९२५, मुंबई,पुणे -९८२२९७९७३२, अरिहंत अपार्टमेंट फोन ०२३१- २५२३००५ मुंबई कार्यालय- सत्यवान बिल्डिंग,पडवळनगर ए ठाणे वेस्ट ४००६०४ .Whatsapp-9108766862

# शालग्याची इच्चा....

आज गुरुवार आसा. मठात जाव व्हया हुनत शालग्या बेगी बेगी रानुन घेय होता. सांजे जावक गावाचा नाय आताच जावन यतलय. भाकरी खावन त्याना सोमता आदान ठेयला. तांदूळ आसडून हाडून टॉपात वतून ता पाटल्या दारा मात्येक लायलले घोट्ये हाडुक गेला. घोट्ये हाडून गुंड्यान फोडून साला काढून त्याना ते धुवक बाजूक ठेयले. तवसर आदान तापला. सोमते तांदूळ धुवन त्याना आदनात वतले. झाऱ्यान ढवळून झारो बाजूक ठेवन ता फुगत घातलंले फजाव नि घोट्ये धुवक ता भायर गेला. बरे धुवन हाडून टाकयेतला पानी वतून त्याना ते दुसरे बाजूक उकडत घातले. भातार झारो मारून ता खोबरा कातुक बसला. खोबरा कातून वायच कानो उबो चिरून वायच बारीक चिरून करटेत ठेवन ता उठला. भात परत ढवळून बगल्यान तर बॉट चेपो झाल्लो. त्याना वायच पानी ठेवन भात गाळल्यान. पेज ढाकून ठेवन भात इंगळ्यार ठेवन त्याचार झाकाण मारल्यान. हडे फजाव फुगत घातलले होते ते शिजले तशे त्याना तवो ठेवन खोबरा भाजून घेतल्यान. खोबरा न्हिवता हुनासर खोलयेत जावन घालूचे कपडे बाजूक काडून ता परत चुलीकडे इला. खोबरा वाटुक जातला तितक्यात जोरात घडघडला. जव पडाक लागली. जोरात पावस सुरू जालो नि लायट गेली. लायटीर शिरा पडली हुनान ता पाट्यार वाटूक बसला. पाट्यार वाटून त्याना दियाच्या उजेडात सामारा फोडणेक घातला. भर दोंपारा आंधारान पावस पडा होतो. शालग्याचो बापुस ख्वाळ घेवन घराक इलो.शालग्या लोट्यार बसान पावस बगी होता. "गो शोलग्या, अगो पुलार पानी इला मगो. पयलाडी दोन चार चाकी गाडये उबे आसत. अडाकले बाबडे..." हुनत शालग्याचो बापुस कपडे बदली होतो. आता काय मठात जावक गावाचा नाय हुनत शालग्या उठान घरात गेला. स्वामींच्या फोटोक पाया पडान त्याना हुतल्यान "माका आज मठात यवचा होता...". शालग्या घरात गेला. बापाशीक गरम पानी देवन त्याना त्वांडाक काय करू काय ईचारल्यान... "फजावाचा सामारा केलं मा..? घोट्ये घालून... पुरे तितक्या... कानो चिरून जवया..." बापाशीन काय करूक सांगाक नाय तसा शालग्या बरा वाटला. त्याका करूचो कंटाळो इल्लो. शालग्यान बापाशीक जवक घातला. आपुनदुक्रू जवक घेतल्यान. जवन बापुस लोट्यारच ढूकाललो. शालग्या जावन खाटीर पडला. तेचो डोळो लागलो. उठला तर भडभडीत दिसा होता. पावस जावन न्हीमार पडता तसा उजाडलला बगून शालग्या भायर इला. त्याका वाटेवरसून मायान साद दिली. "गो शालग्या... चल यतय तर... मिया मठात जातंय..." मायान बापाशीची स्कुटी हाडलली... "अगो पुलार पानी आसा मा... दोंपारा बाबा सांगा होतो... शालग्यान हुतला त्यावर मायान उत्तर दिला... " अगो आता भायगो गाडी घेवन इलो... पानी वसारला... चल यतय तर तयारी कर..." शालग्या धावतच घरात गेला. ड्रेस घालुन बापाशीक जातंय सांगान ता मायाचे गाडयेर बसला... दोगाय मठात गेली... स्वामींचा दर्शन घेवन परत इली. शालग्या खुश जाला. माया त्यका सोडून आपल्या घराक गेला. शालग्यान घरात यवन बापाशीक सांगल्यान तर बापुस हुनाक लागलो. "माया फाटेक आवशी वांगडा मामाच्या घराक गेला हा... ता तुका खडे घेवन जातला... फाल्या यतली हुनान बापुस माका सांगा होतो..." ह्या आयकान शालग्या हसला... "काय तरी काय सांगतास... मिया माया वांगडा जावन इलय... तुमी उठाक नाय होताय नाय तर बगतला होतास..." शालग्या बोलला तरी बापुस काय आयकाक तयार नाय... बापाशीन सांगला तिया असा उठ नि मायाच्या घराक जा बगया... शालग्या उठला मायाच्या घराक गेला बगता तर खळ्यात गाडी नाय... घरात गेला तर म्हातारी होती. "गे आये... माया खडे गेला गे..." शालग्यान मायाच्या आजयेक ईचारल्यान. "अगो माया आवशीक घेवन मामाथुय गेला... फाल्या यतली दोगाय... गाडी घेवन गेली हत..." आजयेचा ह्या उत्तर आयकान शालग्या जाग्यारच बसला. आजयेन त्याका पानी दिला. तसा ता थाऱ्यार इला. त्याना तेनीच हुतलला आठावला... मठात जावची मनातली इच्चा पुरी करनारा माया कोन होता....?? ते स्वामी होते काय...? इचार करीत शालग्या घराक इला. यवन त्याना स्वामींच्या फोटोक हात जोडले...



## गजाल

रीना पास्ते परब

पुणे



# कांदा, मुळा, भाजी....



## मालवणी मुलखात

वयल्यांचा कवग्या,
मालवण- सिंधुदुर्ग.

आषाढ महिनो म्हणजे पंढरीच्या वारीचो महिनो. नेमक्या ह्याच महिन्यात भात लावणीची, आवटी लावची कामा जोर धरतत. आषाढात तर पावसाकय लय जोर येता. आता गेल्या आठवड्यापासून बघताहास ना ओ, पाव्स डोळे ढापून वतताहा! हल्लीचो पाव्स ना, लयच हानी करता. लोका म्हणतत, आता कोण शेती करणत नाय. शेतात जाय्त नाय. पण पावसाचो असो हुदुदो बघताहास ना, काय आणि कशी करतलास ओ शेती?

आता आषाढेचे उपास सुरु होतीत. माझी सासुबाय तर आषाढ म्हणणाच नाय. ती आखाड म्हणता. ती पण कधी आखाडी एकादशीचो उपास चुकवना नाय. दिवसभर शेतातली कामा नि फराळाक दोन तीन रताळी. कधी कधी वरयेच्या तांदळाचो भात. झालो फराळ. देव काय सांगना नाय, माझ्या उपासाक अमक्याच खावा नि तमक्याच खावा. अशी फळा खावा नि तशी फळा खावा. उपास धरा नि दिवसभर घरात बसान आराम करा, असाय सांगना नाय. आता ह्या पावसाच्या दिसांत दिवसभर घरात बसान न्हवाक कोणाक परवाडता? आज चार आवे खोवले तर सरायक मण, दोन मण भात घरात येय्त. नायतर दिवसभर उपास धरा, भजन करीत बसा, टाळ कुटीत बसा, असा खयचो देव सांगता?

पंढरीचो पांडुरंग म्हणजे गोरगरीबांचो देव. भोळ्या भाबड्यांचो देव. तेचे भक्त तरी बघा, ज्ञानोबा कुळकर्णी, तुकोबा वाणी, सावता माळी, गोरोबा कुंभार, नरहरी सोनार, सेना न्हावी वगैरे सगळे संत महात्मे बघशात तर, बारा बलुतेदार. जो तो आपापल्या प्रपंचात, कामात व्यस्थ. काम करता करता पांडुरंगाचा भजन नि पांडुरंगाची भक्ती. त्यामुळेच ते म्हणतत, कांदा, मुळा, भाजी, अवघी विठाई माझी! आमी पण बाय अशीच भक्ती करतव. भात लावता लावता, तरवो काढता काढता, भैमूग घालता घालता मुखात पांडुरंगाचा नाव. आमच्या शेजारची बयोबाय तर भैमूग, लावणी नडता नडता किती सुंदर ओवये नि अभंग गायची. भैमूग नडाक बसली काय देवाची गाणी गाता गाता ती सरासरा पाता घेव्न फुडे जायची. आमचे दादा तर झापा विणता विणता, दोरी वळता वळता पांडुरंगाचे अभंग गायचे.

आता परवाच्या एकादशीचो माझो उपास असोच असतलो. भाता अजून लाव्न खय झालीहत? आवटी लावची आसा. भैमूगात जाव्वा आसा. परत भरडाची भाता नडणेक येतहत. कुळीद पेरुचो आसा. आता ही कामा करता करताच आमची भक्ती सुरु असतली. नाय तरी संत महात्मे सांगान गेलेहत ना, कांदा मुळा भाजी। अवघि विठाई माझी॥








# पालक पनीर पराठा



स्वाती पाटील
पलूस ,सांगली

**नवीन आणि रुचकर शाकाहारी रेसिपी: पालक पनीर पराठा**

**साहित्य:**

- गव्हाचे पीठ: २ कप
- पाणी: मळण्यासाठी आवश्यक
- पालक: १ कप (स्वच्छ धुऊन बारीक चिरलेला)
- पनीर: १/२ कप (किसलेला)
- आलं-लसूण पेस्ट: १ चमचा
- हिरव्या मिरच्या: २-३ (बारीक चिरलेल्या)
- जिरे पावडर: १/२ चमचा
- धणे पावडर: १/२ चमचा
- गरम मसाला: १/२ चमचा
- मीठ: चवीनुसार
- तेल किंवा तूप: पराठे शेकण्यासाठी

**कृती:**

**पिठ मळणे:**

1. **एका मोठ्या परातीत गव्हाचे पीठ घ्या.**
2. **त्यात मीठ घाला आणि व्यवस्थित मिक्स करा.**
3. **थोडे थोडे पाणी घालून मऊ आणि एकसारखे पीठ मळा. पीठ मळल्यानंतर ते थोडे वेळ बाजूला ठेवा.**

**सारण तयार करणे:**

1. **एका कढईत थोडेसे तेल गरम करा.**
2. **त्यात आलं-लसूण पेस्ट घालून परता.**
3. **आता बारीक चिरलेला पालक घालून २-३ मिनिटे परता.**
4. **पालक शिजल्यानंतर त्यात किसलेला पनीर, हिरव्या मिरच्या, जिरे पावडर, धणे पावडर, गरम मसाला आणि मीठ घाला. सर्व साहित्य नीट मिसळा.**
5. **सारण थंड होऊ द्या.**

**पराठे तयार करणे:**

1. **मळलेल्या पिठाचे छोटे-छोटे गोळे बनवा.**
2. **प्रत्येक गोळा लाटून त्यावर सारण ठेवा आणि पराठा बंद करा.**
3. **हलक्या हाताने लाटून पराठा बनवा.**

**पराठे शेकणे:**

1. **तवा गरम करा.**
2. **पराठा तव्यावर ठेवा आणि दोन्ही बाजूंनी तुपात किंवा तेलात खमंग शेकून घ्या.**
3. **गरमागरम पालक पनीर पराठे दही किंवा चटणी सोबत सर्व्ह करा.**
4. **अधिक आनंदाने खा आणि तुमच्या कुटुंबासोबत शेअर करा!**



# पाऊस - कधी हवासा कधी नकोसा...

दीपक गुंडये,
मुंबई

सकाळी जाग आली तीच रात्रभर कोसळलेल्या पावसाच्या बातम्यांनी. मध्य रेल्वेची वाहतूक रेल्वेरुळात साचलेल्या पाण्यामुळे मंदावली होती. सकाळीच कामाला निघालेले चाकरमानी कार्यालयीन स्थळी कसे पोहोचावे या विवंचनेत होते. पावसाने धावत्या मुंबईला सकाळीच ब्रेक लावला. मुंबई आणि परिसरातील शाळा, महाविद्यालयांना सुट्टी जाहीर करण्यात आली. रेल्वे प्रवास सुरु केलेले चाकरमानी संथ चाललेल्या रेल्वेतच अडकले. मुंबईत ही परिस्थिती असताना कोकणातही पावसाने धुमाकूळ घातला आहे. नदी, नाले भरून वाहन आहेत. मुंबई गोवा महामार्गाच्या वाहतुकीवर परिणाम झाला आहे. काही दिवसांपूर्वी जेव्हा उकाड्यामुळे जीव हैराण झाला होता तेव्हा पाऊस हवाहवासा वाटत होता. पण जनजीवन विस्कळीत करणारा असा पाऊस मात्र नकोसा वाटतो.

पावसावरून आठवले. लहानपणी आई सांगायची की पावसाला 'मेल्या' हे नाव ठेवलेले आहे. पाऊस पडत नसला तर लोक म्हणतात, 'मेला, वेळेवर पडत नाही.' पाऊस भरपूर पडत असेल तर लोक म्हणतात की "मेला, थांबायचे नावच घेत नाही." निसर्गचक्राचा अविभाज्य भाग असलेला हा पाऊस म्हणूनच कधी हवासा वाटतो तर कधी तो नकोसा होतो.

भारत हा कृषीप्रधान देश असल्यामुळे पावसाचे खूप महत्व आहे. शेतीची कामे पावसाच्या नियमित पडण्यावर अवलंबून असतात. उन्हाळा जास्त लांबला की शेतकरी डोळ्यात प्राण आणून पावसाची वाट पाहत राहतो. पावसाला सुरुवात झाली की त्याला हायसे वाटते. शेतीची कामे सुरु होतात. शेतकरी मनोमन पावसाला धन्यवाद देतो. पण कधीकधी आभाळ फाटून मुसळधार पाऊस पडतो आणि ओल्या दुष्काळाची परिस्थिती निर्माण होते. त्यावेळी परत एकदा शेतकरी हवालदिल होतो. सरकार नुकसानभरपाई जाहीर करते. त्यासाठी पंचनामे केले जातात. नुकसानीचा अंदाज घेतला जातो. नुकसानभरपाई मिळते पण ती एवढी तुटपुंजी असते की 'भीक नको पण कुत्रं आवर' असे म्हणण्याची पाळी शेतकऱ्यावर येते. अशावेळी पाऊस त्याला हवासा वाटण्याऐवजी नकोसा वाटणे साहजिकच आहे.

शहरातील माणसांची वेगळीच तऱ्हा. पावसाने दडी मारली की उकाडा जीव काढतो. पाणीपुरवठा करणाऱ्या तलावातील पाण्याची पातळी कमी कमी होत जाते. पाणीकपात जाहीर होते. पाण्याचे टँकर मागवले जातात. कधी एकदा तलावक्षेत्रात पाऊस पडतो असे वाटायला लागते. तोच पाऊस पडायला सुरुवात झाली की घरोघरी कांदाभजीचा बेत होतो. पावसाळी सहली निघतात. हल्ली तर रील्सचे फॅड असल्यामुळे पावसात भिजतानाचे रील्स बनवले जातात. फक्त पावसाळ्यातच उगवणाऱ्या कवींच्या कवितांचा वेगळाच पाऊस पडतो. हाच पाऊस जोर धरतो आणि लेखाच्या सुरुवातीलाच उल्लेख केल्याप्रमाणे मुसळधार पडतो तेव्हा मात्र शहरी माणसांची तारांबळ उडते. तेव्हा मात्र पावसाचा त्याला तिटकारा येतो.

**असे असले तरी पाऊस हा हवाच. फक्त त्याने माणसाचा लहरी स्वभाव अंगिकारु नये !**

# डिजिटल माहिती

**३] तंत्र मंत्र**

फुजिफिल्मची 'instaxmini ' शृंखला कृती सेनानने केली लॉंच . फोटोग्राफी साठी जागतिक स्तरावर अव्वल दर्जाचा ब्रँड असलेल्या फुजिफिल्म इंडिया ने नुकतीच त्यांच्या instaxmini 'या शृंखलेचे लॉंच मुंबईत एका अनोख्या आणि शानदार सोहळ्यात अभिनेत्री आणि फुजिफिल्मची नवी ब्रँड अँबेसेडर कृती सेननं हिच्या हस्ते केले . या सोहळ्याला फुजिफिल्म इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक कोजीवाडा ,सहयोगी संचालक आणि फुजिफिल्म इंडिया मधील बिजनेस हेड अरुण बाबू हे उपस्थित होते . हा कार्यक्रम म्हणजे instax उत्पादन लाईन आणि ब्रँडमध्ये एक महत्वपूर्ण टप्पा आहे . फुजिफिल्मने या अगोदर १९९८ मध्ये झटपट कॅमेरा लाईन instax mini १० लॉंच केली होती आणि आधुनिक ट्विट सह क्रेडिट कार्ड आकाराचे झटपट फोटो तयार करण्यासाठी पटकन लोप्रियता देखील मिळवली होती . पुढे याच instax चा विविध प्राधान्यक्रमानुसार मिनी ,वाईड ,आणि स्क्वेअर मध्ये विस्तार होत गेला . फुजिफिल्मचे दोलायमान स्वरूपाचे कॅमेरे उच्च गुणवत्तेच्या प्रिंट्स आणि वापरकर्ता अनुकूल डिझाईनसाठी ओळखले जाणारे हे कॅमेरे समकालीन शैलीसह उत्साही फोटोग्राफीसह ,जुन्या गोष्टींचे स्मरण करून देत ग्राहकांसासाठी आवडते कॅमेरे बनतात . "instax 'या नवीन शृंखलेतील कॅमेरे हे कोणताही क्षण क्षणार्धात कॅमेऱ्यात पकडतात आणि मजा तसेच सर्जनशीलतेचा अनोखा मेळ घडवतात .
फुजिफिल्मच्या instax या नव्या शृंखलेची ब्रँड अँबेसेडर म्हणून अभिनेत्री कृती सेनान हिची निवड हि फुजिफिल्म परिवारासाठी नवीन उत्साह आणि ऊर्जा आणते . बॉलिवूड मध्ये कृतीची असलेली प्रचंड लोकप्रियता हि तिच्या ब्रँड अँबेसेडर पदाची योग्यताच दर्शवते . त्यामुळे या नव्या शृंखलेचा प्रचार मोठ्या प्रमाणात होण्यास मदत होणार आहे . instax mini हे आधुनिक ग्राहकांच्या गरज पूर्ण करण्यासाठी डिझाईन केले असून सुधारित वैशिष्ट्य ब्राईटनेस नियंत्र आणि आकर्षक डिझाईनसह त्वरित प्रिंट ऑफर करते . हे हिरवा ,निळा ,गुलाबी ,जांभळा आणि हलका राखाडी रांगांमध्ये १० अंडी ४० शॉट्सच्या कॉम्बोपॅक मध्ये उपलब्ध असेल . मिनी एसइ फन पॅकची किंमत १० शॉटसह ८,४९९ असेलतर मिनी एस इ **जॉयपक ची किंमत ९,९९९ इतकी असेल .**

**संकलन -संयोजन**
**सुशीलकुमार**
**ईमेल -susheelkumar८०@yahoo.com**



## आठवणींच्या गोष्टी

राष्ट्रपाल सावंत,
चिपळूण- रत्नागिरी
मो. ९४०३१४४३६६..

## पहाडी आवाजाचा गायक : महेशबाबू कव्वाल

चौवीस में दोन हजार वीस या दिवशी कव्वाली ,गायन क्षेत्रातील एक पहाडी आवाजाचा बादशहा ,महेशबाबू कव्वाल तथा महेश काशीराम गमरे ,मुळगाव परचूरी ता गुहागर जि रत्नागिरी चे सुपुत्र हे कुणाच्याही ध्यानीमनी नसताना केवळ दहा दिवस अतिदक्षता विभागात(icu) मृत्यु शी झुंज देत आपल्या सर्व कलाप्रेमी रसिक , चाहते ,कुटुंब ,नातेवाईक ,मित्रमंडळी यांना सोडून गेले .दादा आपल्यात नाहीत ही कल्पनाच मनाला सहन होत नाही .आपल्या मराठी हिंदी ,उर्दू , कव्वाली ,भीम गीते ,लोकगीतांनी रसिकांच्या मनाचा ठाव घेणारा ,लहान थोराना ,नामांकित ,नवोदित यांना आपलंसं करणारा दिलदार कलावंत .असा अचानक जाईल स्वप्नांतही वाटलं नव्हत .

एक मार्च 2020मुंबईत बांद्रा सरकारी कॉलनीतील सांस्कृतिक केंद्रांत कोकणातील प्रतिभावान ज्येष्ठ कवी रमेशजी येलवे यांच्या प्रथम स्मुतीदिनी त्यांच्याच गीतांच्या पुस्तक प्रकाशन सोहळ्यात मी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होतो .कारण गीतसंग्रहाला प्रस्तावना लिहिण्याची संधी बहुजन हितवर्धिनी संस्थेचे अध्यक्ष कविवर्य संतोषजी गमरे आणि पदाधिकारी यांनी मला दिली .महाराष्ट्रातील नामवंत कवी गायक सामाजिक राजकीय क्षेत्रातील मान्यवर तिथं उपस्थित होते .माझं त्या ठिकाणी येलवे दादांच्या लेखन आणि जीवन कार्याविषयी भाषण ऐकून दादा खुश !साहेब माझ्यावेळी पण असंच भाषण करा, हे मला हसत हसत म्हणाले ,तिथं त्यांनी गीत गायन करून सर्वांची मन जिंकली .मला गांवी यायचे म्हणून मी दादांना भेटून कार्यक्रम मधून निघालो .सावकाश जा खूपच धावपळ करता तब्बेतीची काळजी घ्या म्हणाले .त्यानंतर आठ दहा दिवसांत देशांत कोरोना महामारी ,लॉकडाऊन आले ,दादांच निधन 24/5/2020रोजी ठाणे येथे झाले .बातमी ऐकून धक्काच बसला .दादांच अंत्यसंस्कार ,वा पुण्यानुमोदनला उपस्थित रहाता आल नाही याचं शल्य माझ्यासहअनेकांच्या मनात आहे .इतरांना आपल्या गीत गायनाने आदरांजली वाहणाऱ्या दादांना आम्ही शब्द सुरांची श्रध्दांजली ,आदरांजली वाहू शकलो नाही ही खंत आहे .

**"तू लाख इफाजात कर ले**
**तू लाख करे रखवाली उड़ जायेगा एक दिन पंछि रहेगा पिंजरा खाली"**
**हे गीत तेवढ्याच ताकदीने दादा गात असत ,माहोल तयार करत .**
**"गावोगावी एक रमा जन्मा यावी "सोसलेत हाल केली भूमीवर कमाल**
**कांगालाना आज केले मालामाल**
**धन्य तो भिमाईचा लाल ,**

भीमराव न्यारा तो भीमराव न्यारा बहुजनांचा प्यारा आणि वामन दादांचं गीत ते गात
**चांदण्याची छाय, कापराची काया**
**माऊलींची माया होता**
**माझा भिमराया**



अशी असंख्य गीत आणि कॅसेट सी डी त अन्य गीत गायलीत .येलवेंच्या स्मुतीदिनीही दादांनी ,"उड जायेगा एक दिन पंछी" गीत गायल . तेचं बहुदा त्यांच शेवटच गीत .स्वरसम्राट प्रल्हाद शिंदेना आपला गुरू माननारे दादा , गोविंदराव म्हशिलकर ,विठ्ठल उमप ,नवनीत खरे ,जनार्दन धोत्रे या महान कलावंताना आपले आदर्श मानीत .लोक दादांना "प्रल्हाद शिंदे "म्हणत . दादा दिसतही त्यांच्यासारखेच पण मी त्यांची बरोबरी नाही करू शकत अस म्हणत.त्यांच्या आवाजाच स्वरसम्राट प्रल्हाद शिंदेनी आणि वरील मान्यवर गायकांनी कौतुक करून शाबासकी दिली आहे .,दादांनी सुरुवातीस या ज्येष्ठांना कोरस साथ दिली आहे ,ज्येष्ठ गायिकाआदरणीय सुषमादेवी , रंजनाजी शिंदे ,मीनाक्षीताई थोरात ,कविताताई विद्यागर ,मैनाताई कोकाटे , वैशालीताई शिंदे अशा अनेक गायिकां सोबत कार्यक्रम केले .ते त्यांचा आदर राखून गात . आणि गायिकाही त्यांचा आदर करीत.वडिलांचा कला वारसा त्यांनी गायनाने जपला , त्यांचे वडिल उत्तम वादक होते आणि वाद्येही बनवित असत .लहानपणा पासून मी त्यांची गीत गावी ,मुंबईत ऐकली आहेत .मुंबईत ,गावी त्यांच्या समोर गातांना मला आदरयुक्त भीती वाटतं असे . पस्तीस वर्षांपूर्वी त्यांनी नायगावला माझ गाणं दुरुनच ऐकलं मग पुढे येऊन पाठीवर कौतुकाची थाप मारली .सराव ठेव म्हणाले .मी गातो ,लिहितोय यापेक्षाही मला अनेक मानसन्मान मिळाले यांचा त्यांना आनंद अभिमान होता .माझ्या विषयी इतरांना कौतुकाने सांगत .

मी शिक्षक झाल्यापासून त्यांच्यापेक्षा पंधरा वीस वर्षांनी मी लहान असून मला ते "साहेब" म्हणत .मोठ्या मोठ्याना, इतरांना गाणी देता मला पण द्या, हिंदीत लिहा म्हणायचे.दोन वेळा माझ्या घरीही आले. माझे पुरस्कार सन्मान पाहून मला मिट्टी मारून शाबासकी दिली.अजून मोठे व्हा म्हणाले. त्यांच मन मोठं होत. दादांच्यामुळे अनेक कलावंताशी माझी ओळख झाली. काही माझ्या घरी येऊन गेलेत . कोकणापेक्षाही मुंबई नाशिक,विदर्भ, मराठवाड्यात,ठाणे भागांत त्यांचा चाहता वर्ग होता. मुंबईत मी त्यांचे कार्यक्रम ऐकले आहेत कधी जुगलबंदीत गाण्याची कटींग लिहून दिली आहे. लहानमुला सारखे निरागस मन, साधाभोळा निर्गवि स्वभाव. तेवढेच संवेदनशील, प्रसंगी आक्रमकही होते. नामांतर, रिडल्स, सामाजिक ऐक्य, इंदूमिल लढ्यात मोर्चे, गीत गायनातून त्यांनी जनजागृती केली आहे. क्रॉमटन ग्रस लिमिटेड कंपनीत नोकरी केली. जवळपास तीस पस्तीस वर्षे ठाण्यात राहीले. दोन मुलगे मुलीला योग्य शिक्षण दिलं.कव्वाली जुगलबंदी कार्यक्रम मध्ये त्यांनी मुलांना सोबत नेल नाही. पण एकदा हट्ट करून मोठा मुलगा सोबत आलाच, सामाजिक गीता बरोबरच लोकगीतं लोकांच्या आग्रहास्तव दादांनी गायली.कार्यक्रम संपल्यावर मुलगा म्हणाला "पप्पा तुम्ही अशी गाणी गाता ? दादा मुलाला म्हणाले," बाळा त्यांचेच लोक पैसे देतात. लोकांसाठी असं कधीतरी गावं लागत." पुन्हा कधी मुलगा सोबत आला नाही आणि तो येतो म्हणून यांनी मुलांना नेल नाही ही आठवण दादांनी सांगितली आणि म्हणाले तुम्ही सिंगल कार्यक्रम करता तेचं उत्तम.सामाजिक कार्यात योगदान दिलं दादांच्या निधनाने कलाक्षेत्रातील मार्गदर्शक गेल्याच सर्वांना दुःख आहेच पण दादांच्या गुणांचा सर्वांना आदर आहे.कलाकार देहाने जातो पण तो कलेने अजरामर राहतो.माझ्या गावात १८ मे२०१७ रोजी प्रख्यात गायिका सुषमाताई आणि त्यांचा कार्यक्रम झाला. ताईंनी माझी गाणी कॅसेट सी डी त गायली आहेत. दादा माझे नातेवाईकच मला म्हणाले स्टेजवर दोघांच्या मध्येच बसा. काहीवेळ बसलोचं. कार्यक्रम अप्रतिम रंगला. दादांविषयी आदराच स्थान आम्हा सर्व कलावंत यांच्या हृदयात कायमच राहील.

**दादांच्या स्मुतीस विनम्र अभिवादन.**

## ने मजसि ने....

श्रीराम धोंडू चिंदरकर,
चिंदर,

**ने मजसी ने परत मातृभूमीला**
**सागरा प्राण तळमंला...**

८ जुलै १९१० हाच तो ऐतिहासिक दिवस ज्या दिवशी भारतमातेच्या एका वीराने, भारतमातेला ब्रिटिशांच्या तावडीतून मुक्त करावे अथवा स्वतः मरावे हा निर्णय घेत भयावह असा धाडसी निर्णय घेत ज्याप्रमाणे धगधगत्या अग्निकुंडात उडी घ्यावी त्याप्रमाणे त्या विराने खवळलेल्या अशा अथांग सागरात उडी घेतली.



**तो वीर म्हणजेच " विनायक दामोदर सावरकर. "**

**तुजसाठि मरण तें जनन**
**तुजवीण जनन तें मरण ।**

**अर्थात** : हे मातृभूमे तुझं साठी मरण हे जगण्या पेक्षा बेहतर आहे,
आणि तुझ्या विना जगणे हे तर मरणप्राय आहे...

हाच विचार जो सावरकरांनी आपल्या "जयोस्तुते" काव्यात मांडला होता तो आज प्रत्यक्षात आणायची वेळ आली होती. लंडनमध्ये मदनलाल धिंग्रा यांनी कर्झन वायली या इंग्रज अधिकाऱ्याला गोळ्या घालून ठार मारले होते या कृत्यात सावरकांचा च हात होता तसेच अनंत कान्हेरेंनी देखील नाशिक च्या जुलमी कलेक्टर जॅक्सन ची हत्या केली होती त्याच कारणास्तव सावरकांरचे जेष्ठ बंधू बाबाराव सावरकर यांना पण काळया पाण्याची शिक्षा झाली होती आणि लहान बंधू नारायण सावरकर यांनाही इंग्रज सरकारने ताब्यात घेतले होते आणि या सर्वामागे एकच शक्ती कार्यरत होती ज्या शक्तीने ब्रिटिश हुकूमशाही मध्ये दहशत निर्माण केली होती. त्यामुळे ब्रिटिश सरकार ला देखील कळून चुकले होते की खोडावर घाव घालून चालणार नाही तर मुळावरच घाव घातला पाहिजे कारण त्यावेळी सावरकरांनी हिंदुस्थान मध्ये अशी काही दहशत माजवली होती की कुठला ही अधिकारी हिंदुस्थान मध्ये नियुक्त होताना सांगायचा की " कुठे पण नियुक्ती करा पण हिंदुस्थान मध्ये नको " कारण त्या दशकामध्ये सावरकरांनी असे काही क्रांतिकारक घडवले होते जे फासावर जायला आतुरच झाले होते एवढी प्रचंड देशभक्तीची क्रांतीज्योत सावरकरांनी पेटवली होती.

त्यामुळे इंग्रज समजून गेले होते की याला रोखले नाही तर हा देशवेडा इंग्रज सरकारची राखरांगोळी केल्याशिवाय शांत बसणार नाही. त्यावेळी अशी परिस्थिती सावरकरांनी निर्माण केली होती की ज्या प्रमाणे द्वापार युगात महाभारता मध्ये पांडव पक्षाच्या बाजूने राक्षसरुपी भीम आणि हिडिंबा पुत्र घटोत्कचाने कौरव सेनेचा प्रचंड विध्वंस करत कौरव सेनेला भयाभित करून सोडले होते त्याच प्रमाने सावरकरांनी इंग्रजी सत्तेला घाम फोडला होता. त्यामुळे सावरकरांना बंदिस्त करणे अनिवार्य झाले होते.

त्यामुळे सावरकरांना ब्रिटिश अधिकाऱ्यांची हत्या करण्यास प्रवृत्त करणे आणि हिंदुस्थान मध्ये गुप्तपणे हत्यारे पुरवत ब्रिटिश सरकार सोबत राजद्रोह केला म्हणून लंडन मध्ये अटक करण्यात आली.आणि हिंदुस्थान मध्ये खटला चालवण्या साठी सावरकरांना १ जुलै १९१० या दिवशी "एस एस मोरिया" या बोटीमध्ये चढवण्यात आले आणि असंख्य इंग्रज अधिकाऱ्यांसह काटेकोर बंदोबस्त करण्यात आला होता. तो एवढा काटेकोर होता की सावरकरांना क्षणभर पण एकटे सोडले जात नसे. जेवताना बाजूला दोन अधिकारी, चालताना दोन अधिकारी असत. त्यामुळे सावरकरांना निसटणे जवळ जवळ अशक्यच होते. पण शांत बसेल तो पिंडच कसला. ज्या माणसाने भारत मातेच्या स्वातंत्र्यासाठी स्वतःच्या संसाराची होळी पेटवली होती त्याला रोखणे साक्षात समुद्र देवतेला पण जमणारे नव्हते.

'मोरिया बोट' काही तांत्रिक बिघाडामुळे मार्सेलिस बंदरात थांबवण्यात आली होती त्याच दिवशी म्हणजे ८ जुलै १९१० रोजी सकाळी ६.३० च्या दरम्याने सावरकरांनी इंग्रज अधिकाऱ्यांस विनंती केली की मला शौचास जायचे आहे आणि हा बहाणा बनवून ते शौचालया मध्ये गेले आणि आपले कपडे काढून त्या काचेच्या असलेल्या शौचालयाच्या दारास अडकवले जेणेकरून आत मधल्या हालचाली बाहेरील अधिकाऱ्यांना दिसू नयेत. आणि बोटीला असलेल्या 'पोर्ट होल' चा अंदाज घेत त्या होलातून स्वतःचे अंग खरचटण्याची, ओरखडण्याची, जखमा होण्याची कसलीही चिंता न करता त्या होला मधून अथांग सागरात उडी मारली.

याची चाहूल इंग्रज अधिकाऱ्यांना लागताच त्यांनी पाहिले की सावरकरांनी समुद्रात उडी मारली. हे पाहताच पाण्यात गोळीबार केला पण सावरकर कसेबसे निसटले. इंग्रज अधिकाऱ्यांनी देखील त्यांचा पाठलाग सुरू केला. सावरकांनी सर्व योजना आधीच आखून ठेवली होती त्यांना माहीत होते की आपण पोहत पोहत जाऊन फ्रांस चा किनारा गाठला की तिथे जाऊन राजकीय शरण मागू शकतो कारण सावरकरांचा आंतरराष्ट्रीय कायद्याचा अभ्यासही दांडगा होता. त्यामुळे सावरकरांनी अतोनात प्रयन्त करत किनारा गाठला आणि अंगावर धड पूर्णपणे कपडे सुद्धा नव्हते अशा अर्धनग्न अवस्थेत धावू लागले आणि फ्रान्स पोलीस अधिकाऱ्यांस शोधू लागले परंतु मागून इंग्रज अधिकारी पाठलाग करत होते

पण त्यावेळी नियतीच्या मनात काही वेगळेच होते. सावरकरांना फ्रांस पोलिस अधिकाऱ्यांनी पकडले त्यावेळी सावरकर त्यांना ओरडून तोडक्या मोडक्या फ्रेंच भाषेत व इंग्रजी भाषे मध्ये सांगत होते की "मी राजकीय कैदी आहे कृपया मला शरण द्या, मला अटक करा" कारण आंतरराष्ट्रीय कायद्या नुसार फ्रान्स च्या भूमीवर पाय ठेवला तर तो व्यक्ती त्या देशास स्वाधीन असतो म्हणजेच एक प्रकारे त्याला त्या देशाचा नागरिक समजले जात असे त्यामुळे दुसऱ्या सरकारला त्याचा ताबा देऊ शकत नसत परंतु ब्रिटिश अधिकाऱ्यांनी त्या फ्रेंच अधिकाऱ्यास लाच देऊन बेकायदेशीर रित्या आपल्या ताब्यात घेतले आणि पुन्हा " एस एस मोरिया " बोटीमध्ये चढवले गेले. आणि पुढे जाऊन सावरकरांना २५-२५ अशी मिळुन तब्बल ५० वर्षे काळ्या पाण्याची शिक्षा झाली. खरंच सावरकरांचा हा प्रयत्न जर यशस्वी झाला असता तर भारताला वीस-पंचवीस वर्षे आधीच स्वातंत्र्य मिळाल असत एवढं नक्कीच...

परंतु आपण असे समजू नाही शकत की सावरकरांची ही त्रिखंडात गाजलेली उडी व्यर्थ गेली कारण फ्रांस किनाऱ्यावरील त्या प्रसंगाने अनेक युरोपीय वृत्तपत्रांनी ही घटना वर्तमानपत्रात छापली आणि त्यामुळे संपूर्ण राजकीय वातावरण ढवळून निघाले आणि जगभरात भारताच्या स्वातंत्र्या विषयी चर्चा सुरू झाल्या आणि सर्वत्र ब्रिटिश सरकारची पाय्यमल्ली सुरू झाली.

अशा प्रकारे वीर सावरकरांच्या सुटकेचा प्रयत्न जरी अयशस्वी झाला असला तरी त्यांची ती उडी मात्र पूर्णपणे यशस्वी झाली कारण सावरकरांच्या इच्छेनुसार भारताच्या स्वातंत्र्याचा प्रश्न जगभर निनादू लागला...

# काव्यांगण

## जबाबदारी

अगदी लहानपणीच
ती स्विकारते जबाबदारी
भावंडांना सांभाळण्याची,
जमेल तशी घरकामात
आईला मदत करण्याची.
केरकचरा, भांडीकुंडी
थोडं चिरणं-किसणं,
हळूहळू सरावानं
स्वैपाक पाणी करणं.

थोडं मोठं झाल्यावर
जबाबदारी वयाची
वागण्याबोलण्यातील
अमर्याद मर्यादांची,
मन मारून जगण्याची.
समाजाच्या नजरकैदेची,
अधाशी नजरांपासून
स्वतःलाच जपण्याची.

आणखी एक जबाबदारी
सून म्हणून निभावण्याची,
साऱ्या अपेक्षांना खरे उतरून
स्वतःला सिद्ध करण्याची.
स्वतः मुलगी असूनही
मुलगा हवा म्हणण्याची
वंशाला दिवा देण्याची.

वाढत्या वयानुसार
वाढत जाते जबाबदारी
मुलानातवंडांना सांभाळण्याची
घराचे घरपण जपण्याची.

ती फक्त निभावत जाते
अंगावर पडणारी जबाबदारी
तिला ना निवड ना आवड
ना संधी नाकारण्याची.
ती आणि तिच्या जबाबदाऱ्या
गृहितच धरल्या जातात
जणू साऱ्या जबाबदाऱ्या
तिच्यासोबतच येतात नि जातात.

प्राजक्ता आपटे, वेंगुर्ला

## जबाबदारी

जवाबदारी जवाबदारी
ऐकताच राग येई भारी
अरे, हसावं, खेळावं
पक्ष्यासम आकाशी उडावं
कोकीळेसम सुमधूर गावं
मयुरासारखं खूप नाचावं
झऱ्यावाणी खळखळ वाहावं
बाळासम निरागस हसावं
मोगऱ्यासारखं मस्त गंधाळावं
वाऱ्यावाणी रिंगण घालावं
इंद्रधनू सारखं रंगबिरंगी व्हावं
ढगांसमान गडगडावं
वृक्षाला पाहून तटस्थ व्हावं
वेलीसारखं पसरत जावं
कस्तुरीमृगासम दरवळावं
वासरासमान हुंदडत जावं
थोडक्यात निर्बंध व्हावं
मोरपिसाहून हलकं व्हावं
स्वच्छंद होऊन उंच उडावं
असं सपान मी रोज पहावं
अशात का तू आडकाठी बनावं ?
बंधनात मी का अडकावं ?
जवाबदारीचं ओझं का उचलावं ?
जवाबदार होताच मन मारावं ?
इच्छेविरुद्ध मी का वागवं ?
जवाबदारीच्या भारानं मरून जावं ?
स्वतःच्या जवाबदारीपासून विन्मुख व्हावं ?
मला दंडित मीच करावं ?
पश्चतापानं होरपळून जावं ?
जबाबदारी कसलीही नको मला
जवाबदारीचा मज लै कंटाळा
जवाबदारी नकोच मजला
तव जवाबदारी मुबारक तुजला

डॉ. प्रेमा मेणशी,
बेळगावी-कर्नाटक

## जबाबदारी

जाणून घ्यावी प्रत्येकाने आपापली जबाबदारी
कशास होतील भांडणतंटे घेतली जर का खबरदारी ||

हसरे राहिल गोकुळ अपुले प्रत्येकाची जबाबदारी
सान थोर अन् प्रत्येकाने घेतली जर का खबरदारी ||

या देशाचा नागरीक मी आहेत माझी कर्तव्ये काही
भान ठेवुनी वागलो जर मी साध्य होईल बरेच काही ||

विकासाची गंगा आणिली नेता मारितो बोंब सारखी
निसर्ग आम्हां शिकवी सारे दृष्टी मात्र हवी पारखी ||

संकटकाळी धावून जावे सांगते अमुची येथली माती
मायभूमीचे रक्षण करणे वसा घेऊनी जपुया नाती ||

सौ. मानसी सावंत,
दापोली

## वहिवाट

**आजी संगे बसलो होतो, आजी माऊलीत दंग !**
**सहज विचारले तिला, का ग, आयुष्यभर विठूसंग !!**
**स्मितहास्यासह पानावले तिचे डोळे, अन म्हणे !**
**नाही रे आयुष्यभर, विठ्ठलच आयुष्य जगणे!!**
**मला नाही कळले, आजी जे म्हणाली !**
**डोक्यावरती हात फिरवून, वारीला चल म्हणाली !!**

**पृथ्वी पाटील**
**सावर्डे, चिपळूण**

## जबाबदारी

असते प्रत्येकाची...
असते प्रत्येकाला...
जबाबदारी !
जबाबदारी !

घ्यावी प्रत्येकाने...
द्यावी प्रत्येकाला...
जबाबदारी !
जबाबदारी !

घ्यावी समजून...
द्यावी समजावून...
जबाबदारी !
जबाबदारी !

घ्यावी ओळखून..
घ्यावी स्वतःहून...
जबाबदारी !
जबाबदारी !

कधी ती मोठी...
कधी ती छोटी...
जबाबदारी !
जबाबदारी !

विसरू नये कधी...
झटकू नये कधी...
जबाबदारी !
जबाबदारी !

सदा पार पाडावी...
सदा ओळखावी...
जबाबदारी !
जबाबदारी !

राज भिंगारे,
खेड

## जबाबदारी

प्रत्येक चेंडूवर लागत असतो
लाखोंचा सट्टा
प्रत्येक धावेवर कुटला जातो
अंदाजांचा खलबत्ता
अचानक कोसळतो ढग भरून
कट होतो खेळाचा पत्ता
तरी हिशोब सुरू असतो
डकवर्थ लुईस रुल ठरवतो सत्ता
...
मंडळ काळजी घेते
मंडळ भरपाई देते
मंडळ जबाबदारी घेते
...
माझा बळीराजाही मांडतो डाव
आणि ढ ढगांचा बनतो 'ढ'
कधी शेत बनते कोरडे ठाक
कधी उभ्या पिकावर मुसळधार

नावापुरताच बळीराजा
कोण राजा कोणाची सत्ता
भिकेपेक्षाही कमी असतो
मदतीच्या नावाचा भत्ता

बांधावरच्या शब्द मैफिलीत
जबाबदारींचा भरतो कट्टा
डकवर्थ लुईस रुलला मात्र
कोणी देईना शेतकऱ्याचा पत्ता
कोणी देईना शेतकऱ्याचा पत्ता

अजित दळवी,
हिंदळे- देवगड



## विठाई...

विठाई विठाई | चित्त तुझ्या पायी |
तूच दिसे ठायी | मज आता ||

दर्शना तुझिया | जीव आतुरला |
किर्तनी रंगला | वारकरी ||

वाट चालतात | विठू भेटीसाठी |
चरणाशी मिठी | तुझ्या देवा ||

गजर घुमतो | चंद्रभागेकाठी |
घेती गळाभेटी | भक्तजन ||

तुझे कृपादान | सार्थकी जीवन |
आनंदते मन | पांडुरंगा ||

विराज विलास चव्हाण,
वाटूळ- राजापूर

## सावित्रीमाई

तू गिरवली नसतीस अक्षरे तर
आजही आम्ही चूल आणि मूल
याखालीच दबून गेलो असतो
गरज नाही आपल्याला स्वातंत्र्याची
अस वाटणार् या जगापुढं
तू वाट दाखवलीस आम्हाला
आणि
दगड धोंड्याचा मारा सहन करत
आमच्यासाठी शिक्षणाच आभाळ
मोकळ करून दिलंस
तू नसतीस झाली आमचा दीपस्तंभ तर
दाहीदिशा भरकटलो असतो
मुक्त भोगतेय स्वातंत्र्य आज मी
प्रत्येक पदावर विराजमान आहे मी
फक्त आणि फक्त तुझ्यामुळेच
माझ अस्तित्व असेपर्यंत सावित्रीमाई
तू सोसलेल्या यातनांची जाणीव ठेवीन
जेंव्हा जेंव्हा कुणी मुलगी
शाळेत पाय ठेवील
सावित्रीमाई मला
तुझीच मूर्ती तिच्यात दिसेल
तुझीच मूर्ती तिच्यात दिसेल

सुभाष भाऊ चोपडे,
राजापूर

## जबाबदारी

जीवन हीच आहे
एक जबाबदारी,
इथं क्षणाक्षणाला
ती संभाळावी लागते..!

जबाबदारी कुठलीही असो,
पूर्ण क्षमतेने तिला
प्रतिसाद देण्यास आपण
समर्थ असावे लागते...!

जबाबदारी वय
पाहून येत नाही,
पण खांदे मात्र
मजबूत करून जाते...!

देश तेव्हाच मोठा होतो
जेव्हा प्रत्येक नागरिकाला,
देशासाठी त्यागण्याची
जबाबदारी समजते...!

प्रा. के.एस.शिरबंदे,
दापोली

## जबाबदारी

कळले नाही केव्हा कुठे पोचलो
वाट तुडवत माझ्यात मी हरवलो
स्वतःशीच लढत धडपडत उठलो
जबाबदारी ने मी झेलीत गेलो......|| धृ ||

आंधळ्या स्वप्नांनी का जाग यावी
मन लाचार बनून तरी का फिरावी
निरुत्तर झालेले प्रयत्न मी बनलो
जबाबदारी ने मी झेलीत गेलो......|| 1||

काळ्या पांढऱ्या रंगामध्ये गुंतावे
दोन रंगाचे जणू इंद्रधनुष्य सजवावे
सप्तरंगात सर्वांना न्हावू घालत गेलो
जबाबदारी ने मी झेलीत गेलो......|| 2||

विज्ञानाचा प्रयोग आधार निष्कर्षाचा
विश्वासाचा प्रमेय नसे आधार सिद्धतेचा
विश्वासाने प्रमेय सिद्ध करत गेलो
जबाबदारी ने मी झेलीत गेलो......|| 3||

प्रसाद बागवे, मुणगे-
देवगड

## जबाबदारी

जबाबदारी घ्यावी मोठी
पार करावी अवघी नौका
यत्न करावे ठोस जाणुनी
कुणा न द्यावा दुसरा मौका

भान असावे ध्येयाचे ते
ढळू न द्यावे चित्त कदापी
ध्यानी घेती तसे वागती
जबाबदारी पार पाडती

चिमणी पोरे धावत येती
गुरुजी गुरुजी साद घालती
जबाबदारी गुरुवर्यांची
ज्ञानदान त्यांना देण्याची

बाप बापडा थकतो दमतो
पोरांसाठी राबराबतो
नकाच विसरू त्या बापाला
तुटक्या चपला रोज घालतो

दिधले बळ ते पंखांना या
जाण ठेवुया त्या आईची
सुखात राहिल पुढे माउली
जबाबदारी ही मोलाची

समाजातला भाग असे मी
जबाबदारी ठायी ठायी
भान ठेव रे जाणीवांचे
नकाच तुडवू पायी पायी

बापू घाडीगांवकर,

# बालजगत

## मैत्रीची दुनिया



कु. स्वानंदी हरेश मोहीत,
कोंगळे, ता. दापोली.

आपल्या सर्वांना माहीतच आहे की मनुष्य हा आपल्या जन्माबरोबरच अनेक नात्यांच्या माळेमध्ये गुंफला जातो. त्याच्या जन्मापासूनच त्याच्या जीवनात नाती प्रस्थापित होण्यास सुरुवात होत असते. मग ते आई- वडिलांचं असो आजी-आजोबाच असो वा भाऊ-बहिणीच. कोणतेही प्रश्न मनात येण्याआधीच ही नाती तयार होत असतात. खरंतर ही संपूर्ण प्रक्रिया त्याच्या जन्मापासूनच सुरु होते. मग कधी या प्रक्रियेत त्याला सुखाचे तर कधी दुःखाचे क्षण देखील अनुभवावे लागतात. तर कधी कधी सहकार्याचे आदान प्रदान देखील होते. परंतु आयुष्यात काही अशी नाती असतात की ज्यामध्ये अपेक्षा कमी आनंद,विश्वास आणि प्रेम या भावनांच्या आधारावर निर्माण झालेले असतात. जस की एखाद्या आईच आणि तिच्या मुलाच कारण हे एक अस नात आहे की ज्याची तुलना आपण कोणत्याही नात्याबरोबर करू शकत नाही परंतु याच्या व्यतिरिक्त जर एक उदाहरण द्यायचं म्हंटल तर ते म्हणजे मैत्रीचा. कारण मनुष्य हा एक समाजिक प्राणी आहे आणि एक समाजिक प्राणी असल्याने तो कधीही एकटा राहू शकत नाही म्हणूनच तो नेहमी आपल्या सभोवतालच्या लोकांशी संवाद साधन्याचा प्रयत्न करत असतो.आपल्याला कोणीतरी समजून घेईल,ज्याच्या जवळ आपण आपल मन व्यक्त करू शकतो अशा माणसाच्या शोधात तो नेहमी असतो. त्यामुळे मैत्री हे फक्त एक नात नाही तर एक साधन आहे ज्याद्वारे आपण आपल्या मनातील भावना, दुःख इतरांसोबत व्यक्त् करु शकतो. खरंतर मैत्री हा शब्द फक्त दोन अक्षरी जरी असला तरी यामध्ये प्रचंड भावना दडल्या गेल्या आहेत. कारण यामध्ये अपेक्षा नसून एकमेकांचा आनंद पहिला जातो. म्हनुन जगातील सर्वात सुंदर कोणत नात असेल तर ते म्हणजे मैत्रीच आहे. करण मैत्री ही आपल्याला जीवनाबद्दल खूप काही शिकवत असते. मैत्रीतून आपण एवढे धडे शिकतो की जे आपण इतर ठिकाणी शिकू शकत नाही. लोकांना कस समजून घ्यायचं आणि इतरांवर कसा विश्वास ठेवायचा हे आपल्याला मैत्रीतूनच शिकायला मिळत. त्यामुळे नाही म्हणटल तरी मैत्री ही आपल्या आयुष्यात घडणाऱ्या अनेक क्षणांची साक्षीदार असते. मैत्री ही कधी, कुठे, कशी होईल हे काही सांगू शकत नाही. खरंतर मैत्रीला वयाची,काळाची बंधने नसतात. म्हणून आयुष्याच्या प्रत्येक वळणावर होणारी मैत्री हि खास असते मग ती शाळेतील असो महाविद्यालयातील वा वृद्धापणातिल. यामध्ये धर्म,जात,लिंग काही पाहिलं जात नाही कारण आपल्या समाजात स्त्री-पुरुश मैत्री कडे खूप वेगळ्या दृष्टिकौणातू पाहिलं जात त्यामुळेच आजच्या जातीभेद आणि मतभेदीच्या दुनियेत मैत्री हे एक उत्तम उदाहरण बनले आहे. हे नात जरी रक्ताच नसल तरी ते रक्ताच्या नात्या पेक्षा खूप दृढ असत. परंतु जर आजच्या काळाचा विचार केला तर आपण ही एक गोष्ट देखील लक्षात ठेवली पाहिजे की आपल्याला आपल्या जीवनाच्या प्रत्येक टप्यावर अनेक लोक भेटतील परंतु संपर्कात येणारी प्रत्येक व्यक्ती साथ देईलच अस नाही म्हणून मैत्री ही कधीही पारखून करावी कारण मैत्री जर एखाद्याच्या हसण्याचं कारण बनत असेल तर तिच एखाद्याच्या रडण्याचं करण देखील बनू शकत. म्हणूनच तर अस म्हंटलं जात की 100 मित्र असल्यापेक्षा 100 गुण असलेला एकच मित्र बरा.त्यामुळे मैत्री हे एक नात जरी असल तरी ती एकप्रकारची कलाच आहे अस देखील म्हणत चुकीचं ठरणार नाही.

## शेतीतली मजा !



कु. वेदिका सुभाष मुलूख,
इयत्ता- आठवी

आपला भारत देश शेतकरीप्रधान देश आहे. प्रत्येक मुलाला शेतीविषयी जाणीव असली पाहिजे. पावसाळा आला की मला खूप आनंद होतो. कारण शेतात जाऊन भात लावण्याची मजा काही वेगळीच. भात लावताना चिखलातून बैल नांगरतात त्यांच्या मागून फिरायला मला खूप आवडतं. मी पावसाळ्यात मामाकडे शेती करायला जातेच जाते. भात लावून झालं की दुपारी तिथेच पाटाच्या पाण्यात हातपाय धुवून आंब्याच्या झाडाखाली जेवायला बसायचं. त्यातही खूप मज्जा आहे. पिकाची काढणी करताना ऐकू येणारी भलार गीते हीच खरी शेतकऱ्याची ओळख.

मी एकदा माझ्या आजोळी गेले होते तेव्हा आमच्या शेताच्या बाजूला कोणीतरी आजी आजोबा दोघेच पीक काढत होते आणि हसत आनंदाने भलार गीत गात होते. मला ते खूप आवडलं. आता शेतकरी एवढे कष्ट करून, दिवस-रात्र राब राबवून पीक पिकवतात म्हणून आज आपण ऐशआरामत जेवतोय. मात्र तरीही कितीतरी अन्नाची नासाडी होताना दिसत आहे.

शेती करणे एवढं सोप्पं नाही. त्यासाठी खूप कष्ट घ्यावे लागतात. शेती म्हणजे एक प्रकारचे सुख आनंदी जीवन. शेतीतली मजा बाकी कुठेच नाही.





कु. मंजिरी सचिन पवार,
इयत्ता- सातवी




कु. विराज राजेंद्र मुलूख,
इयत्ता- सातवी




कु. आदित्य जगदाळे
इयत्ता- सातवी

## चंद्रनगर शाळेत 'वृक्षवल्ली आम्हां सोयरे' उपक्रम



**दापोली-** आनंददायी शनिवार अंतर्गत दापोली तालुक्यातील जिल्हा परिषद चंद्रनगर मराठी शाळेत नुकताच 'वृक्षवल्ली आम्हां सोयरे' हा उपक्रम समारंभपूर्वक राबविण्यात आला. या उपक्रमाच्या निमित्ताने शाळेच्या आवारात वृक्षारोपण करण्यात आले.

शासनाच्या 'दप्तराविना शाळा' उपक्रमांतर्गत सर्व शाळांमधून आनंददायी शनिवार साजरा होत आहे. या दिवशी दप्तर किंवा दैनंदिन अध्यापन न घेता शाळेतील सर्व विद्यार्थ्यांसाठी कृतीयुक्त व मनोरंजनपर उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. याच उपक्रमाचा एक भाग म्हणून दापोली तालुक्यातील जिल्हा परिषद चंद्रनगर मराठी शाळेत शनिवारी 'वृक्षवल्ली आम्हां सोयरे' या विशेष उपक्रमाचे नियोजन व आयोजन करण्यात आले होते. शाळेतील सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांनी वृक्षपूजा करून या उपक्रमाचा शुभारंभ केला. टेबलावर आरास करून वृक्षांची पूजा व आरती करण्यात आली. या उपक्रमाच्या निमित्ताने शाळेतील शिक्षक मानसी सावंत, मनोज वेदक, बाबू घाडीगांवकर यांनी सजीव सृष्टीत वृक्षांचे महत्व, वृक्ष आणि पर्यावरण, वृक्षपूजा करण्याची माणसावर वेळ का आली? जर जगातील सर्व वृक्ष नष्ट झाले तर काय होईल? आदी विषयांवर मार्गदर्शन केले. यावेळी शाळेतील अथर्व रांगले, आरोही मुलूख, नीरजा वेदक, प्रसाद शिगवण, विराज मुलूख, सौम्या बैकर, समर्थ मुळे, वीर अबगुल आदी विद्यार्थ्यांनी वृक्षराजीचे महत्त्व स्पष्ट केले.

या कार्यमातंर्गत पूजन केलेल्या वृक्षदेवतांना पालखीत बसवून शाळेच्या आवारात वृक्षदिंडी काढण्यात आली. दींडीसोबत फिरताना विविध नृत्याविष्कार करत विद्यार्थ्यांनी सामुहिक अभंग व गीतगायन केले. वृक्षारोपण, वृक्षसंवर्धन व वृक्षसंगोपनाबाबतच्या घोषणाही दिल्या. पालखीतील वृक्ष व इतर वृक्षांचे शालेय परीसरात वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी वृक्षसंवर्धन व वृक्षसंगोपनाची सामुहिक शपथ घेतली. आनंददायी शनिवार उपक्रमांतर्गत 'वृक्षवल्ली आम्हां सोयरे' उपक्रम यशस्वी होण्यासाठी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रुपेश बैकर व शाळेतील सर्व शिक्षकांनी विशेष मेहनत घेतली.